
रविवार, ५ डिसेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक १३८
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

सिडकोविरोधातील टाळे बंद आंदोलन तूर्त स्थगित/२
अर्थविषयक घडामोडींचा वेध घेणारे सदर अर्थ प्रहर/४
मुंबई कसोटी : टीम इंडियाने 'किवीं'ना गुंडाळले/६


## 'ओमायक्रॉन'ची महाराष्ट्रात एण्ट्री; डोंबिवलीतील एकाला लागण



**डोंबिवली :** कोरोनाचा नवा विषाणू ओमायक्रॉनचा महाराष्ट्रातील पहिला रुग्ण कल्याण-डोंबिवलीत आढळला आहे. या रुग्णावर आरोग्य यंत्रणा मागील काही दिवसांपासून लक्ष ठेवून होती आणि त्याचे नमुने जीनोम चाचणीसाठी पाठवण्यात आले होते. या चाचणीचा अहवाल शनिवारी (दि. ४) पॉझिटिव्ह आला. त्यामुळे चिंता व्यक्त होत आहे. या रुग्णाचे वय ३३ असून तो २४ नोव्हेंबर २०२१ रोजी दक्षिण आफ्रिकेतील केपटाऊन शहरामधून कल्याण-डोंबिवलीत आला होता. तो दुबई आणि दिल्लीमार्गे मुंबईत दाखल झाला. ओमायक्रॉन विषाणूचा संसर्ग झालेला तो राज्यातील पहिला रुग्ण आहे. गंभीर म्हणजे त्याने कोणतीही कोविड प्रतिबंधक लस घेतलेली नसल्याचे वृत्त आहे. त्याच्यावर सध्या कोविड केअर सेंटरमध्ये उपचार सुरू आहेत.

### छत्रपती शिवरायांसाठी प्रोटोकॉल ठेवला बाजूला

## राष्ट्रपती उद्या रोप वेने किल्ले रायगडावर जाणार



**महाड : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज हे अखंड भारताचे दैवत आहेत. त्यामुळेच शिवभक्तांच्या भावनांचा आदर करीत महामहीम राष्ट्रपती रामनाथ कोविंद आपला प्रोटोकॉल बाजूला ठेवत सोमवारी (दि. ६) रायगड किल्ल्यावर हेलिकॉप्टरने नव्हे; तर रोप वेने जाणार आहेत, अशी माहिती छत्रपती खासदार संभाजीराजे यांनी दिली.

राष्ट्रपती रामनाथ कोविंद हे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक शिवरायांना अभिवादन करण्यासाठी रायगडावर येणार आहेत. जगातील महाशक्तिशाली व्यक्तींमध्ये भारताच्या राष्ट्रपतींची गणना केली जाते, कारण ते ज्या तीन सैन्यदलांचे प्रमुख आहेत ती लष्करी सेना जगात तिसऱ्या क्रमांकाची आहे. त्यामुळे राष्ट्रपतींचे आगमन शिवभक्त आणि समस्त मराठीजनांसाठी अभिमानाची बाब आहे. प्रोटोकॉलप्रमाणे राष्ट्रपतींचे हेलिकॉप्टर रायगडावर उतरणार होते, परंतु छत्रपती शिवाजी महाराजांपेक्षा कोणताही प्रोटोकॉल मोठा नाही या जाणिवेतून शिवभक्तांच्या भावनांचा आदर करीत राष्ट्रपतींनी रोपवे ने गडावर येण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या या शिवभक्तीस मी सॅल्यूट करतो, असे संभाजीराजे यांनी म्हटले आहे. दरम्यान, राष्ट्रपतींच्या निर्णयाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# खालापूरमध्ये शेकापला धक्का

## माजी नगराध्यक्ष दिलीप पवार कार्यकर्त्यांसह भाजपत दाखल



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुकीच्या धामधुमीत सत्ताधारी शेतकरी कामगार पक्षाला जोरदार धक्का बसला आहे. शेकापचे माजी नगराध्यक्ष दिलीप पवार यांनी त्यांच्या समर्थक कार्यकर्त्यांसह शुक्रवारी (दि. ३) भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी पवार यांचे पक्षात स्वागत केले. पवार यांच्यामुळे ऐन निवडणुकीच्या रणधुमाळीत शेकापला खिंडार पडले असून भाजपची स्थानिक फळी मजबूत झाली आहे.

या कार्यक्रमास भाजप जिल्हा सरचिटणीस विनोद साबळे, काशिनाथ पारठे, कोषाध्यक्ष सनी यादव, भाजप शहर अध्यक्ष राकेश गव्हाणकर, युवा मोर्चा अध्यक्ष प्रसाद पाटील, युवा नेते अतिष खेडेकर, दीपक जगताप आदी उपस्थित होते.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कामाचे प्रतिबिंब निवडणुकीच्या रूपात प्रतिसादाच्या माध्यमातून पाहावयास मिळत आहे. मोदीजींनी सत्तेची संकल्पना बदलली. जातीपातीला मूठमाती दिली. तुष्टीकरणाचे राजकारण बदलले. काही देण्याचे बंद करून शाश्वत कार्य सुरू केले. याची पोचपावती मिळत आहे. खालापूर नगरपंचायतीमध्ये सक्षम उमेदवार देऊन ही निवडणूक जिंकू, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी व्यक्त केला. (पान २ वर..)

### भाजपचे बळ वाढतेय -आमदार प्रशांत ठाकूर

या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिलीप पवार व सहकाऱ्यांचे स्वागत करताना म्हटले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्याचे माजी मुख्यमंत्री व विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांचा ओढा भाजपकडे आहे. त्यामुळे भाजपचे बळ वाढत आहे. पक्षात आलेल्या कार्यकर्त्यांची यथोचित दखल घेतली जाईल.

# जिल्हा परिषदही हातातून गेली तर शेकाप नेत्यांना डबे घेऊन कामावर जावे लागेल



**अलिबाग : प्रतिनिधी**

दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अखेर अलिबाग-रोहा मार्गाच्या नुतनीकरणाच्या कामाला सुरुवात झाली आहे. आमदार महेंद्र दळवी यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि. ४) या कामाला प्रारंभ झाला. भूमिपूजन समारंभाच्या निमित्ताने त्यांनी शेकापवर तोंडसुख घेतले. जिल्हा परिषदही हातातून गेली तर शेकाप नेत्यांना डबे घेऊन कामावर जावे लागेल, असा टोला आमदार दळवी यांनी लगावला.

### ■ आमदार महेंद्र दळवी यांचा टोला

अलिबाग-रोहा मार्गाची गेल्या दीड ते दोन वर्षांपासून दुरवस्था झाली होती. हायब्रीड एनयूटीच्या माध्यमातून सुमारे दोनशे कोटी रुपये खर्चून या रस्त्याच्या नुतनीकरणाला मंजुरी देण्यात आली, मात्र प्रत्यक्षात काम सुरू होऊ शकले नव्हते. शेकापने या रस्त्याच्या दुरवस्थेकडे लक्ष वेधण्यासाठी दीड महिन्यापूर्वी आंदोलन केले होते. या वेळी शेकाप नेते आमदार जयंत पाटील व त्यांची सून चित्रलेखा पाटील यांनी स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांना लक्ष्य केले. आमदारांच्या टक्केवारीमुळे रस्त्याचे काम रखडल्याचा आरोप त्यांच्याकडून करण्यात आला होता.

या आरोपांना रस्त्याच्या भूमिपूजन समारंभात आमदार महेंद्र दळवी यांनी उत्तर दिले. शेकापला जनतेने अनेकदा संधी दिली, मात्र त्यांनी विकास केला नाही. त्यामुळे लोकांनी मला निवडून दिले. त्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, असे सांगून आता मी मंजूर करून आणलेल्या कामांचे श्रेय घेण्याचा प्रयत्न शेकापने सुरू केला आहे, असे आमदार दळवी म्हणाले.

जिल्हा परिषदेवर यांची सत्ता आहे. किती रस्ते शेकापने केले? मुरूड-साळाव रस्त्याचे काम शेकाप आमदार पंडित पाटील यांच्या काळात मंजूर झाले. त्यांच्याच सुप्रभात कंपनीने रस्त्याचे काम घेतले, पण रस्ता काही झाला नाही. आता पुन्हा एकदा त्या कामाला मुदतवाढ देण्यात आली असल्याचे आमदार दळवी यांनी सांगितले. टीका करताना वयाचे भान राखा, असा सल्लाही त्यांनी शेकापच्या नवोदित नेत्यांना दिला.

## पेंग्विनची काळजी घेणाऱ्यांना बाळासाठी वेळ नाही का?

### भाजप नेते आशिष शेलारांचा सवाल

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील नायर रुग्णालयात डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे एका बाळाचा व त्याच्या वडिलांचा मृत्यू झाल्याने भाजप नेते आमदार आशिष शेलार यांनी राज्य सरकार आणि महापालिकेवर जोरदार हल्ला चढवला आहे. याच परिसरात असलेल्या राणीच्या बागेतील पेंग्विनवर दिवसाला दीड लाख रुपये खर्च होतात. वर्षाला या पेंग्विनवर १५-१६ कोटी रुपये खर्च कराल, पण बाळाला वाचवण्यासाठी ४५ मिनिटांत पोहचणार नाही का, असा सवाल शेलार यांनी केला आहे.

डॉक्टरांच्या चुकीमुळे एका बाळाचा मृत्यू झाला. त्यावरून प्रशासनाला जाब विचारायला जाणाऱ्या भाजपच्या नगरसेविकांशी असभ्य भाषेत बोलले जाते. त्यांना मारण्यासाठी गुंडांना बोलावले जाते. ही अरेरावी कशासाठी? राज्यात काय गब्बरचे राज्य आहे का? अशी संतप्त विचारणा करतानाच महापालिकेत काल झालेल्या राड्याची चौकशी करण्याची मागणीही भाजप नेते आशिष शेलार यांनी केली आहे. (सविस्तर वृत्त पान २ वर..)

## पॅरासेलिंग करताना दोर तुटून दोन महिला समुद्रात कोसळल्या

### अलिबागच्या वरसोली किनाऱ्यावरील थरारक घटना



**अलिबाग : प्रतिनिधी**

पॅरासेलिंग करताना पॅराशूटची दोर तुटून दोन महिला पर्यटक १०० फूट उंचावरून थेट खोल समुद्रात कोसळल्याची घटना अलिबागजवळील वरसोली येथे घडली. सुदैवाने या दोघींचाही जीव लाईफ जॅकेटमुळे वाचला आहे. याबाबतचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर २७ नोव्हेंबर रोजीची ही घटना सर्वांसमोर आली आहे.

मुंबईच्या सुजाता नारकर आणि सुरेखा पाणीकर या दोन महिला कुटुंबीयांसह अलिबागजवळील वरसोली बीचवर पर्यटनासाठी आल्या होत्या. या वेळी एकत्र पॅरासेलिंग करीत असताना त्यांच्या पॅराशूटचा दोर तुटला आणि त्या समुद्रात कोसळल्या. लाईफ जॅकेटमुळे या दोन महिला समुद्रात पडल्यावर तरंगत राहिल्या. बोटचालकाने या महिलांना समुद्रातून पुन्हा बोटीत घेतले. या महिलांचे काही नातेवाईक बोटीवर होते. त्यांच्या डोळ्यादेखत हा भयानक प्रकार घडला. याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. या घटनेमुळे समुद्रकिनारी पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते देवभूमीत तब्बल १८ हजार कोटींची विकासकामे



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि. ४) देवभूमी उत्तराखंडची राजधानी डेहराडूनमध्ये तब्बल १८ हजार कोटींच्या योजनांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. यामध्ये प्रामुख्याने रस्त्यांच्या विकासकामांची संख्या जास्त आहे. पंतप्रधान मोदींनी या वेळी सभेला संबोधित करताना उत्तराखंडच्या विकासासाठी गेल्या पाच वर्षांत केंद्र सरकारने एक लाख कोटी रुपयांहून अधिक निधी मंजूर केला असल्याचे सांगितले. भारत आज आधुनिक पायाभूत सुविधांमध्ये १०० लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक करण्याच्या उद्देशाने पुढे जात आहे. आम्ही पर्वतांमध्ये राहणाऱ्या लोकांसाठी राहण्याच्या सुलभतेला प्राधान्य देतो. दुर्दैवाने मागची अनेक दशके सत्तेत राहिलेल्यांच्या धोरणात ही बाब कुठेच नव्हती, असे म्हणत पंतप्रधान मोदींनी काँग्रेसवर टीका केली.

## निवडक

### गुजरातमध्येही आढळला ओमायक्रॉनचा रुग्ण

**अहमदाबाद :** भारतात ओमायक्रॉन व्हेरिएंटचा तिसरा रुग्ण आढळला आहे. गुजरातमधील जामनगर येथील व्यक्ती ओमायक्रॉनबाधित असल्याचे स्पष्ट झाले आहे. हा व्यक्ती झिम्बाब्वेमधून परतला आहे. त्याचा कोविड चाचणी अहवाल पॉझिटिव्ह आला होता. त्यानंतर त्याचे नमुने जीनोम सीक्वेन्सिंगसाठी पाठवण्यात आले होते. त्याचा अहवाल शनिवारी (दि. ४) आला असून त्यात त्याला ओमायक्रॉनची लागण झाली असल्याचे निदान झाले आहे.

### एमपीएससी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर


**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०२२मध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे. एमपीएससी राज्यसेवा परीक्षा २ जानेवारी २०२२ रोजी होणार आहे. मुख्य परीक्षा ७ ते ९ मे २०२२ रोजी होईल. परीक्षेसाठी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख २५ ऑक्टोबर आहे.


|| प्रथम पुण्यस्मरण ||
(रविवार, दि. ५ डिसेंबर २०२१)



माया आपली स्मरते.. येते डोळ्यातुन पाणी.. .
ओठ आजन्म गातील आपल्या आठवणी...!
कै. लक्ष्मण तुकाराम पाटील
विनम्र अभिवादन!
आपले विनित : मे. एल. टी. पाटील अॅण्ड सन्स
व्यवस्थापक : समस्त पाटील परिवार खारकोपर व मोरावे
पत्ता : साई मंदिर खारकोपर, सेक्टर ८, उलवे नोड, नवी मुंबई





पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
रविवार, दि. ५ डिसेंबर २०२१ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड
सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)
१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. जुने ग्रामीण रुग्णालय, कोळीवाडा-उरण नाका, पनवेल
३. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल
४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
६. कर्नाटक समाज हॉल
(पहिल्या सहा केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.)
७. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
८. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
९. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
१०. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
११. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
१२. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
१३. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली

कोवॅक्सिन
सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)
१. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
२. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

# महाराष्ट्रात गब्बरचे राज्य आहे का?

## ‘नायर’मधील प्रकरणावरून आशिष शेलारांचा संतप्त सवाल

**मुंबई : प्रतिनिधी**

नायर रुग्णालयात डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे एका बाळाचा मृत्यू झाल्याने भाजप नेते आशिष शेलार यांनी राज्य सरकार आणि महापालिका प्रशासनावर जोरदार हल्ला चढवला आहे. डॉक्टरांच्या चुकीमुळे एका बाळाचा मृत्यू झाला. त्यावरून प्रशासनाला जाब विचारायला जाणाऱ्या भाजपच्या नगरसेविकांशी असभ्य भाषेत बोलले जाते. त्यांना मारण्यासाठी गुंडांना बोलावले जाते. ही अरेरावी कशासाठी? राज्यात काय गब्बरचे राज्य आहे का? असा संतप्त सवाल भाजप नेते आशिष शेलार यांनी केला.

आशिष शेलार यांनी भाजपच्या प्रदेश कार्यालयात पत्रकार परिषद घेऊन राज्य सरकार आणि महापालिका प्रशासनाला धारेवर धरले आहे. वरळी बीडीडी चाळीतील सिलेंडर स्फोटातील जखमींना नायर रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले होते, मात्र रुग्णालयाच्या हलगर्जीपणामुळे एका बाळाचा मृत्यू झाला आणि आता बाळाच्या वडिलांचादेखील मृत्यू झाला आहे. या घटनेवर शेलार यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.



अशा प्रकारच्या मोठ्या दुर्घटनेनंतर रुग्ण पालिकेच्या रुग्णालयात उपचारांसाठी जातात, पण तिथे सुरक्षित नाही. रुग्णांवर वेळेवर औषधोपचार होणार नाहीत. मुंबईच्या महापौर घटनेनंतर ७२ तासांनी रुग्णालयात पोहचल्या. ७२ तास कुठे झोपला होतात? मुंबई पालिकेत चाललेय काय? असा सवाल शेलार यांनी केला.

नायर रुग्णालयात पोहचलेल्या जखमी रुग्णांना जवळपास ४५ मिनिटे, तसेच ठेवले होते. त्यांच्यावर कोणतेही उपचार किंवा त्यांची विचारपूस केली गेली नाही. रुग्णालयाच्या याच हलगर्जीपणामुळे चार महिन्याचा बाळाचा मृत्यू झाला आणि त्याच्यामागे त्याच्या वडिलांचा देखील मृत्यू झाला. या सगळा प्रकार टाळकं फिरवणारा आहे, असा संताप त्यांनी व्यक्त केला.

### ‘जाधव यांच्या विधानाची चौकशी करा’

*मुंबई पालिकेच्या रुग्णालयात सुरू असलेला हा हलगर्जीपणा सर्वांसमोर आला आहे. त्याचा निषेध म्हणून आरोग्य समितीच्या भाजप सदस्यांनी राजीनामा दिला. सभागृहात याबाबत जाब विचारला तर त्यावर स्थायी समिती अध्यक्ष यशवंत जाधव यांनी सभागृहात असभ्य भाषा वापरली. गळा दाबून टाकू, गळा चिरून टाकूपर्यंतची दमदाटी ते करू लागले. त्यांच्या वक्तव्याची चौकशी करावी, अशी मागणीही आमदार शेलार यांनी या वेळी केली.*

मुंबई पालिकेच्या रुग्णालयात सुरू असलेला हा हलगर्जीपणाचा सभागृहात याबाबत जाब विचारला तर त्यावर स्थायी समिती अध्यक्ष यशवंत जाधव यांनी सभागृहात असभ्य भाषा वापरली. गळा दाबून टाकू, गळा चिरून टाकूपर्यंतची दमदाटी ते करू लागले. त्याबद्दल सवाल केला तर यशवंत जाधव यांनी भायखळ्यातील गुंड सभागृहाबाहेर बोलावले. त्यांनी भाजप नगरसेविकांना धक्काबुक्की केली. मुंबईकरांनी निवडून दिलेल्या नगरसेविकांसोबत असे वागणार? गुंडाकडून धक्काबुक्की करणार? गब्बर सिंगचे राज्य आहे काय? असा खरमरीत सवाल त्यांनी केला. या सगळ्या घटनेचे चित्रण आमच्याकडे आहे त्यामुळे त्याची चौकशी करा. स्थायी समितीचे अध्यक्ष यशवंत जाधव यांनी काही विधाने केली आहेत. त्यांच्या वक्तव्याची चौकशी करावी, आवश्यक असल्यास गुन्हा दाखल करा, अशी मागणीही त्यांनी केली. याच वेळी सत्ताधारी शिवसेनेने माहुल येथील ३० कोटींचा भूखंड पळवून बिल्डरच्या घशात घातल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला.

याच परिसरात असलेल्या राणीच्या बागेतील पेंग्विनवर दिवसाला दीड लाख रुपये खर्च होतात. वर्षाला या पेंग्विनवर १५-१६ कोटी रुपये खर्च कराल, पण बाळाला वाचवण्यासाठी ४५ मिनिटात पोहचणार नाही, हा प्रश्न विचारला तर झोंबतो. आम्ही झोंबणारे प्रश्न विचारतो म्हणून तुम्ही झोंबाझोंबी करणार. या हलगर्जीपणाविरोधात आम्ही हल्लाबोल करणारच, असा इशाराही त्यांनी दिला.

# ‘दिबां’च्या नावासाठी भूमिपुत्र मेळावा यशस्वी करण्याचा निर्धार

## मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे कृती समितीचे आवाहन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरणाच्या लढ्याची पुढील वाटचाल अविरत चालू आहे. त्या पार्श्वभूमीवर नामकरण कृती समितीच्या बैठका विविध गावात सुरू असून वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात ७ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता होणाऱ्या भूमिपुत्र मेळाव्यात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. शिरवणे गावात शुक्रवारी (दि. ३) बैठक झाली. त्या वेळी भुमिपुत्रांनी हा मेळावा यशस्वी करण्याचा निर्धार केला.

लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीच्या मार्गदर्शनानुसार येत्या १३ जानेवारी रोजी लोकनेते दि. बा. पाटील यांच्या जयंतीनिमित्त विमानतळ क्षेत्रावर विमानतळ परिषद होणार आहे. या परिषदेच्या अनुषंगाने लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समिती या मुख्य समितीमार्फत रायगड, ठाणे, पालघर, मुंबई उपनगर व बृहन्मुंबई या पाचही जिल्ह्यांत तालुका व शहर स्तरांवर स्थानिक भूमिपुत्र बांधवाशी मेळाव्याद्वारे विमानतळ नामकरण व भूमिपुत्रांच्या समस्या यावर संवाद साधण्यासाठी भूमिपुत्र मेळावे आयोजित केले जाणार आहेत.

निश्चित केल्या गेलेल्या या भूमिपुत्र मेळाव्याच्या कार्यक्रमाचा आरंभ हा वाशीपासून सुरू झाला आहे. सानपाडा, तुर्भे नंतर शिरवणे गाव ग्रामस्थांनी गावातील हनुमान मंदिरात ग्रामसभा आयोजित केली होती. या ग्रामसभेत वाशी येथील भूमिपुत्र मेळाव्यात सहभागी होऊन स्व. दि. बा. पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विमानतळ नामकरण परिषदेत उस्फूर्तपणे सहभाग घेण्याचा निर्धार शिरवणे ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

या ग्रामसभेत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्र समन्वय समितीच्या वतीने डॉ. राजेश पाटील, सुनील पाटील यांनी मुख्य शिखर समितीचा संदेश ग्रामस्थांना दिला. या वेळी शिरवणे गावातील ग्रामस्थ असलेले दिनेश पाटील, संतोष सुतार, नरेश पाटील, माजी नगरसेविका रोहिणी भोईर, माधुरी सुतार, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष पंढरीनाथ पाटील, समाजसेवक जयेंद्र सुतार, अविनाश सुतार, निर्मला सुतार, प्रभाकर ठाकूर, धीरज भोईर, दीपेश पाटील आणि शिरवणे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजप दक्षिण भारतीय सेलच्या कर्जत मंडल सदस्यांना नियुक्तीपत्रे प्रदान



**कर्जत : रामप्रहर वृत्त**

भाजप उत्तर रायगड जिल्हा यांच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांचे दोन दिवसीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर माथेरान येथे आयोजित करण्यात आले होते. या शिबिरादरम्यान शुक्रवारी (दि. ३) भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते भाजप कर्जत मंडल दक्षिण भारत सेल समिती सदस्यांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.

यामध्ये भाजप कर्जत मंडळ दक्षिण भारत सेलचे संयोजकपदी दिनेश गनिगा, मंडल सहसंयोजकपदी भाऊ राठोड, सदस्य राजेश शिव चव्हाण, विजय चव्हाण, हिराबाई राठोड, कमलीबाई पवार यांना पदाची नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.

या वेळी भाजप दक्षिण भारत सेलचे उत्तर रायगड जिल्हा संयोजक श्रीनिवास कोडुरू, जिल्हा सरचिटणीस दीपक भेरे, कर्जत मंडल अध्यक्ष मंगेश मस्कर, सरचिटणीस राजेश भगत, पनवेल शहर मंडल सरचिटणीस अमरीश मोकल, कर्जत शहर अध्यक्ष बळवंत घुमरे, कर्जत शहर सरचिटणीस सरचिटणीस, दक्षिण भारत जिल्हा कमिटी सदस्य श्रीनिवास राव आदी उपस्थित होते.



**उरण : केंद्रीय बंदरे, जहाजवाहतूक व जलमार्ग आणि पर्यटन राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी जेएनपीटी बंदराचा दौरा केला. या वेळी आमदार महेश बालदी यांनी त्यांचे स्वागत केले. सोबत भाजप महालण विभागीय अध्यक्ष महेश कडू, कामगार नेते सुरेश पाटील, मधुकर पाटील उपस्थित होते.**

## निवडक

### धम्मयान दिनदर्शिकेचे प्रकाशन



**मोहोपाडा :** भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने दरवर्षी धम्मयान दिनदर्शिका प्रकाशित करण्यात येते. या वर्षीसुद्धा धम्मयान कॅलेंडर २०२२चे प्रकाशन भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भीमराव आंबेडकर यांच्या हस्ते दादर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनच्या केंद्रीय कार्यालयात करण्यात आले. या वेळी संस्थेचे महासचिव जगदीश गवई, सचिव आगाणे काका, एस. एस. माने, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष भिकाजी कांबळे, सरचिटणीस सुशील वाघमारे, मुंबई प्रदेशचे अध्यक्ष उत्तम मगरे, सरचिटणीस रवींद्र गवई, कोषाध्यक्ष विलास खाडे आदी उपस्थित होते.

### महापरिनिर्वाण दिनानिमित्त आवाहन

**पनवेल :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे मुंबई प्रदेशाध्यक्ष अमित हिरवे यांनी नुकत्याच पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या घेतलेल्या बैठकीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सर्वांनी ६ डिसेंबरला मुंबई येथे उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. राष्ट्रीय अध्यक्ष मनोज संसारे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीत महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथील स्मृतिस्थळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी लाखो अनुयायी उपस्थित राहतात. या आंबेडकरी अनुयायांना पक्षाच्या माध्यमातून अन्नदान करण्यात येते. तशाच प्रकारचे अन्नदान या वर्षी सुद्धा करण्यात येणार असल्याची माहिती रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी दिली.

# चिरनेरमधील आश्रमशाळेत पौष्टिक खाद्यपदार्थांचे वाटप

**उरण : वार्ताहर**

केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे अध्यक्ष राजू मुंबईकर आणि श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहाय्यता संस्थेच्या संस्थापक संगीता ढेरे यांच्या वतीने चिरनेरमधील आश्रमशाळच्या विद्यार्थ्यांना पौष्टिक खाद्यपदार्थांचे वाटप करण्यात आले.



यामध्ये डाबरसारख्या एका नामांकित कंपनीच्या ब्रँडचे कोरोना सुरक्षा किट आणि प्रेमाची भेट म्हणून डाबर रिअल फ्रेशफ्रुट ज्यूस, फ्रेश नारळपाणी बॉटल्स, ग्लूकॉनडी एनर्जी ड्रिंक्स आणि चोकोस पाकिटे या वस्तू विद्यार्थ्यांना देण्यात आल्या.

या कार्यक्रमास खोपटे बांधपाडा ग्रामपंचायतीच्या सरपंच विशाखा प्रशांत ठाकूर, श्री सखी स्वयंसहाय्यता संस्थेच्या संस्थापक संगीता ढेरे, खोपटे गावचे युवा सामाजिक कार्यकर्ते प्रशांत ठाकूर, खोपटे ग्रामपंचायतीचे सदस्य देवानंद पाटील, अच्युत ठाकूर, संदेश म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते प्रीतम ठाकूर आदी उपस्थित होते.

हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी सेक्रेटरी कॉन विलास ठाकूर, गोवठणे विकास मंचचे अध्यक्ष सुनील वर्तक, आगरी, कोळी, कराडी संघर्ष सा. संस्थेचे उरण तालुका सचिव अनिल घरत, गोल्डन ज्युबली मित्र मंडळाचे अध्यक्ष नवनीत पाटील, उपाध्यक्ष हिराचंद म्हात्रे, आंतरराष्ट्रीय कराटे कोच गोपाळ म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते रोशन पाटील, संपेश पाटील, क्रांती म्हात्रे, मिल पाटील, आश्रम शाळेचे मुख्याध्यापक अप्पासाहेब मोरे, सतीश मोरे, शिवाजी साळुंखे, सरोजिनी मढवी यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचं सूत्रसंचालन सुनील वर्तक यांनी केले, तर उपस्थितांचे आभार अनिल घरत यांनी मानले.



**पनवेल : खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षकपदाचा पदभार नुकताच सुभाष कोकाटे यांनी स्वीकारला. याबद्दल त्यांचे नगरसेविका तथा भाजप ओबीसी महिला जिल्हाध्यक्ष सीता पाटील यांनी अभिनंदन व स्वागत केले.**

# भाजप उत्तर भारतीय मोर्चातर्फे नीट परीक्षार्थींसाठी मोफत प्रशिक्षण

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या उत्तर भारतीय मोर्चातर्फे नीट परीक्षार्थींसाठी मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या उपक्रमाचा प्रारंभ माजी शिक्षण मंत्री आमदार आशिष शेलार यांच्या हस्ते शनिवारी (दि. ४) भाजप प्रदेश कार्यालयात झाला.

उत्तर भारतीय मोर्चाचे प्रमुख संजय पाण्डेय, आर. डी. यादव, संतोष सिंग आदी उपस्थित होते. कोरोना संकटाच्या पार्श्वभूमीवर नीट परीक्षांना बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय झाली. अशा विद्यार्थ्यांसाठी मोफत प्रशिक्षण वर्ग देण्याचा उपक्रम अभिनंदनीय आहे, असे आमदार शेलार यांनी या वेळी सांगितले. मोर्चाचे प्रमुख संजय पाण्डेय यांनी सांगितले की, ज्यांना पहिल्या प्रयत्नांत नीट परीक्षेत उत्तीर्ण होता आलेले नाही अशा विद्यार्थ्यांसाठी अनुभवी प्राध्यापकांचे मार्गदर्शन या वर्गातून मिळेल. ज्या विद्यार्थ्यांना या प्रशिक्षणाचा लाभ घ्यायचा असेल त्या विद्यार्थ्यांनी https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLScPSBFHH7ZMWVEnrAUczsumSbm3d9lUSCufSRp4mCxrKcPPbQ/viewform?usp=sf_link या लिंकवर क्लिक करून नाव नोंदणी करावी, असेही पाण्डेय यांनी सांगितले.

पान १ वरून

### खालापूरमध्ये शेकापला धक्का

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कामावर विश्वास ठेवत मोठ्या प्रमाणात तरुणवर्ग भाजपमध्ये काम करीत आहे. प्रत्येक वॉर्डात मोदींजींच्या विचाराने भारावलेला मतदार आहे. राज्यात देवेंद्र फडवणीस मुख्यमंत्री असताना त्यांनी विविध आश्वासनांची पूर्तता केली आहे. याउलट आताचे ठाकरे सरकार दिलेल्या आश्वासनांना हरताळ फासून जनतेची फसवणूक करीत आहेत, असे सांगून खालापुरात नेते, पदाधिकारी आमच्याकडे येत आहेत हा शुभसंकेत आहेत. खालापूरमधील १७ जागांपैकी १० ठिकाणी सक्षम उमेदवार उभे करू. समविचारी पक्षाचा योग्य प्रस्ताव आला तर बरोबर घेण्याबाबत विचार करण्यात येईल, असेही आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

महड येथील युवा कवी प्रवीण जोशी यांनी लिहिलेले आणि गायिका सोनाली भोईर, गायक दिनेश पाष्टे यांनी गायलेले आई तुझा कळस गं हे गाणे सध्या गाजत असून अल्पावधीतच रसिकांच्या पसंतीस उतरले आहे. याबद्दल युवा कवी जोशी यांचा या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

# सिडकोविरोधातील टाळे बंद आंदोलन तूर्त स्थगित

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिडकोविरोधात नवीन पनवेल येथील कार्यालयावर ६ डिसेंबरला करण्यात येणारे टाळे बंद आंदोलन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या आदेशानुसार ओमायक्रॉन या कोरोनाच्या नव्या व्हेरिएंटचा धोका लक्षात घेता तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. याबाबतचे पत्र नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांनी सिडकोच्या नवीन पनवेल येथील कार्यकारी अभियंत्यांना दिले आहे, तसेच त्याची प्रत खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांना दिली आहे.

नवीन पनवेलमधील भाजप नगरसेवक ६ डिसेंबर रोजी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सिडकोच्या कार्यालयावर प्रचंड मोर्चा काढून या कार्यालयाला टाळे लावणार असल्याबाबतचे पत्र २५ नोव्हेंबर रोजी दिले होते. त्यानुसार २ डिसेंबर रोजी सिडकोने कार्यालयात मिटिंगला बोलावले असता, पनवेल महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर, ॲड. नगरसेवक भुजबळ व अन्य नगरसेवक, तसेच विविध विभागांचे प्रतिनिधी यांच्यामध्ये विविध समस्यांबाबत सविस्तर चर्चा झाली. त्यानुसार सिडकोने काही सार्वजनिक कामे करण्यास सुरुवात केली आहे, तर काही प्रलंबित कामे पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे.

यासोबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी ओमायक्रॉन विषाणूच्या धोक्याचा विचार करता हे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्याचे कार्यकर्त्यांना सांगितले. त्यानुसार ६ डिसेंबर रोजीचे आंदोलन सिडकोने केलेल्या कामाचा लेखाजोखा घेण्यासाठी पुढील कालावधीपर्यंत तूर्त स्थगित करण्यात आले आहे, मात्र दिलेले आश्वासन सिडकोने पाळले नाही व कामे अपूर्ण ठेवली तर पुन्हा हे आंदोलन करू, असा इशारा ॲड. भुजबळ यांनी दिला आहे.


### ज्येष्ठ पत्रकार विनोद दुआ यांचे निधन

**मुंबई :** ज्येष्ठ पत्रकार विनोद दुआ यांचे वयाच्या ६७व्या वर्षी निधन झाले आहे. विनोद दुआ यांनी १९७४ मध्ये दूरदर्शनपासून कामाला सुरुवात केली. पुढे त्यांनी एनडीटीव्ही, सहारा अशा इतरही वृत्तवाहिन्यांसोबत काम केले. काही काळाने त्यांनी स्वतःची प्रोडक्शन कंपनी काढून विविध वृत्तवाहिन्यांसाठी कार्यक्रम सादर केले. त्यांच्या पत्रकारितेतील कामासाठी त्यांना रामनाथ गोएंका आणि पद्मश्री अशा प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेय.



## दुखवटा

### राजेश ठाकूर



**उरण :** भारत पेट्रोलियम कामगारांचे राष्ट्रीय नेते कॉम्रेड राजेश ठाकूर (वय ५७) यांचे गुरुवारी (दि. २) रात्री मोटरवाहन अपघात निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले व पत्नी असा परिवार आहे. भेंडखळ या जन्मगावी शुक्रवारी कै. राजेश यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी कामगार क्षेत्रातील नेते व कामगार, तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कॉम्रेड राजेश हे उत्तम मल्लखांब पट्टू होते. त्यांनी या क्षेत्रात ही काम केले, पनवेल महाविद्यालयात शिक्षण घेत असताना ते विद्यार्थ्यांना मल्लखांब शिकवत असत.

## निवडक

### तळोजातून मोटरसायकलची चोरी

**पनवेल :** तळोजा औद्योगिक वसाहत परिसरातून सलमान खान या तरुणाची मोटरसायकल अज्ञातांनी चोरून नेल्याची घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. तळोजा औद्योगिक वसाहत परिसरामध्ये एका कंपनीमध्ये काम करणारा सलमान पेसकार खान या तरुणाने त्याची मोटरसायकल कंपनीच्या गेटवर उभी करून ठेवली होती. या वेळी अज्ञात चोरट्याने ही मोटरसायकल चोरून नेली. याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पनवेलमध्ये मृतदेह आढळला

**पनवेल :** एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह पनवेल शहर परिसरात आढळला असून त्याच्या नातेवाइकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे, उंची पाच फूट, रंग सावळा, नाक सरळ, केस वाढलेले काळे, दाढीचे केस वाढलेले, मनगटाच्या आतील बाजूस इंग्रजीत एस.डी. असे लिहिलेले असून अंगात लाल, निळा व पांढरा शर्ट व काळी पॅन्ट घातली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक दीपक शेळके यांच्याशी संपर्क साधावा.

### उरण येथे मोफत मातृत्व शिबिर

**उरण :** ज्यांना बाळ होत नाही, जे बाळासाठी प्रयत्न करीत आहेत. त्यांच्यासाठी उरण येथे मातृत्व शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. संतती टेस्टट्यूब बेबी आणि फर्टीलिटी सेंटर यांच्या वतीने उरण येथे मोफत मातृत्व शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर शनिवारी (दि. ११) व रविवारी (दि. १२) हे दोन दिवस सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत नंगेबाबा दर्गासमोर श्री कॉम्प्लेक्सच्या शॉप न. १मध्ये होणार आहे. या शिबिरात प्रख्यात डॉक्टरांचा वैद्यकीय सल्ला मोफत असून सोनोग्राफी, सिमेन्स ॲनालिसीस वैद्यकीय चाचण्या मोफत केल्या जातील. हॉस्पिटलचा पूर्ण स्टाफ वॅक्सिनेट आहे. कोरोनाचे सर्व निर्बंध पाळले जातील. अपॉईंटमेन्ट घेणे आवश्यक आहे. शिबिराच्या नाव नोंदणीसाठी ९८५९८५०८०८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### विद्यार्थ्यांचे शाळेत स्वागत

**उरण :** रायगड जिल्हा परिषदेच्या चिरनेर येथील शाळेत इयत्ता पहिली ते चौथीचे वर्ग सुरू झाले आहेत. यानिमित्त शाळेच्या प्रवेश द्वारावर फुगे, रांगोळी आदी सजावट करून मुलांचे फुगे देऊन स्वागत करण्यात आले. मागील दोन शैक्षणिक वर्षातील पहिलीत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांना चिरनेर येथील अक्का देवी ट्रस्टच्या वतीने चॉकलेट, पुष्पगुच्छ, पेन्सिल देऊन स्वागत करण्यात आले. मुख्याध्यापक प्रवीण म्हात्रे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शरयू ठाकूर व सदस्य तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते.

# गॅसवाहिनीच्या कामाने अपघाताला निमंत्रण

## दांड-रसायनी रस्त्यालगत मातीचे उत्खनन; मुळावर घाव बसल्याने जुनाट वृक्षही जमीनदोस्त

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महानगर गॅसवाहिनी टाकण्याच्या कामामुळे दांड-रसायनी रस्त्याच्या बाजूने खोदण्यात आलेली बाजूपट्टी धोकादायक झाली आहे. त्यामुळे वृक्षांच्या मुळाजवळील माती मोठ्या प्रमाणात निघत असल्याने महाकाय वृक्ष जमीनदोस्त होत आहेत. परिणामी या रस्त्यावर अपघातांना आमंत्रण मिळत आहे.





दांड-आपटा राज्य मार्गावर अशी अनेक वृक्ष असून वासांबे (मोहोपाडा) परिसरात महानगर गॅसवाहिनी टाकण्याचे काम सद्यस्थितीत सुरू आहे. रसायनीत उत्खनानामुळे एक महाकाय वृक्ष जमीनदोस्त होत आहे. त्या मार्गावर अनेक महाकाय जुनाट वृक्ष असून होणाऱ्या उत्खननात वृक्ष जमीनदोस्त होताना एखादा अपघात घडल्यास याला जबाबदार कोण, असा यक्षप्रश्न सध्या सामान्य नागरिकांत चर्चिला जात आहे.

मोहोपाड्यात अभियांत्रिकी महाविद्यालय, डाकघर, बँक आणि शाळा, तसेच काही सरकारी कार्यालय व लोकवस्तीचा परिसराजवळ रस्ता असल्याने प्रचंड वाहतूक होत असून वाहनांची कायमच गर्दी या रस्त्यावर असते. रस्त्यालगत बाजूपट्टी मोठ्या प्रमाणात खोदण्यात आली आहे. प्रचंड मातीचा ढिगारा रस्त्यावर असल्याने आधीच अरूंद असलेला रस्ता झाल्याने एखादा मोठा अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. काम सुरू असताना एखादा अपघात घडल्यास याला जबाबदार कोण? असा प्रश्न सामान्य नागरिक करत आहे.

खोदाई करताना काढण्यात आलेली माती आणि त्यात अवकाळी पावसाचा तडाखा यामुळे रस्ता चिखलाने भरला असून, पादचाऱ्यांना जीव मुठीत घेऊन चालावे लागत आहे. ठेकेदाराने गॅसवाहिनीसाठी खोदाई करताना सुरक्षिततेचे सर्व नियम धाब्यावर बसविले आहेत.

रस्त्यालगत ५० वर्षांपेक्षा अधिक आयुर्मान असलेल्या वृक्षाच्या मुळावर खोदाई करताना घाव बसला आहे. माती भुसभुशीत झाल्याने वृक्ष रस्त्यात कोलमडून पडण्याच्या आठवड्यात दोन घटना घडल्या आहेत. त्यामुळे या रस्त्यावरील वाहतुकीवरही परिणाम होत आहे. बुधवारी रात्री स्थानिक पोलिसांनी तीन तासांच्या प्रयत्नांनंतर पडलेले वृक्ष हटविल्यानंतर वाहतूक पूर्ववत झाली. या रस्त्याकडे सार्वजनिक बांधकाम खाते जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहे, तसेच वन विभागाकडूनही कानाडोळा होत असल्याचे दिसून येते. काम करताना करण्यात आलेला निष्काळजीपणा जीवघेणा ठरत आहे. अगोदरच दांड-रसायनी रस्त्याला पडलेले खड्डे आणि त्यातच रस्त्याची साईडपट्टी खोदकाम झाल्याने माती रस्त्यावर आली आहे. शिवाय या अगोदरपासून रस्त्यालगतचे जुनाट वृक्ष उन्मळून पडल्याने अनेक अपघात झाले आहेत. तरीही सार्वजनिक बांधकाम खाते आणि वनविभाग दुर्लक्षच करीत आहे.

> **दांड-मोहोपाडा-आपटा रस्त्याची पाहणी सार्वजनिक बांधकाम खात्याचे डेप्युटी इंजिनिअर लवकरच करणार आहेत.**
>
> **-रूपाली पाटील, अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग**

# कामोठ्यात मोकळ्या भूखंडाची स्वच्छता

## भाजप नगरसेवक विजय चिपळेकर यांच्याकडून स्वखर्चाने कार्य

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे सेक्टर ६ ए मधील मोकळ्या भूखंडावर साचलेला डेब्रिज आणि कचरा हटविण्यात आला आहे, तसेच परिसर स्वच्छ करून घेण्यात आला. हे काम नगरसेवक विजय चिपळेकर यांनी स्वखर्चाने करून घेतले. त्याबद्दल येथील रहिवाशांनी चिपळेकर यांचे आभार मानले आहेत.



पनवेल महापालिका क्षेत्रात असूनही कामोठे नोड सिडकोने अद्याप महापालिकेकडे हस्तांतरित केले नाही. त्यामुळे कामोठ्यातील रहिवाशांच्या अडचणी आणि समस्यांसाठी वारंवार सिडकोकडे अर्ज विनंत्या तक्रारी कराव्या लागतात. बऱ्याच तक्रारींचे निवारण सिडकोकडून होत नाही. कामोठेतील सेक्टर ६ ए मधील जुही आर्केड प्लॉट नंबर ५५ आणि त्रिमूर्ती प्राईड प्लॉट नंबर ५४ गृहनिर्माण संस्थांमधील रहिवाशांनादेखील मोकळ्या भूखंडावर साचलेल्या डेब्रिज व कचऱ्याचा त्रास होत होता.

साठलेल्या डेब्रिजमधून या सोसायट्यांमध्ये उंदरांबरोबरच अधूनमधून सापदेखील येत असत. यामुळे रहिवासी सतत भयग्रस्त राहत असत. शेवटी 'जुही आर्केड'चे अध्यक्ष बाळासाहेब पडवळ आणि 'त्रिमूर्ती प्राईड'चे रहिवासी समीर पाटील यांनी सोसायट्यांमधील समस्या निवारण करण्याची विनंती नगरसेवक चिपळेकर यांना केली. त्यांनी रहिवाशांना होणाऱ्या त्रासाचे गांभीर्य समजून घेतले. त्रास दूर करण्यासाठी चिपळेकर यांनी स्वखर्चाने जेसीबी आणि डंपर लावून इमारतींच्या कंपाऊंडपासून साठलेला कचरा आणि डेब्रिज बाजूला हटवले आणि परिसराची स्वच्छता करून घेतली. यामुळे रहिवाशांना उंदरांचा होणारा त्रास आणि सापांची भीती कमी झाली.

### कैऱ्यात एकावर चाकूहल्ला

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

कैरे गावात एकावर चाकूहल्ला झाल्याची घटना घडली आहे. आरोपी सिद्धी रामकृष्ण सावद (वय ४८, रा. कैरा, ता. खालापुर) याला पोलिसांनी अटक केली आहे.

दीनानाथ भरत सहानी (रा. कैरा गाव, खालापूर) हा घरात झोपला असताना आरोपी सिद्धीने दीनानाथ व त्याचे मित्र यांना शिवीगाळ करून कामाला चला असे सांगितले.

**आरोपी अटकेत**

दीनानाथने विचारणा केली तेव्हा सिद्धीने दीनानाथला चापट मारली. दीनानाथने प्रतिकार केला असता सिद्धीने चाकूने दीनानाथच्या छातीवर वार केला. त्याचा सहकारी रोशन कुमारलाही मारहाण केली. दीनानाथला पनवेलच्या अष्टविनायक हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले असून आरोपी सिद्धीला रसायनी पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीला पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक वायंगणकर हे करीत आहेत.

# कंटेनरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली येथून मोटरसायकलवरून करंजाडे येथे जाणाऱ्या व्यक्तीला भरधाव कंटनेरने धडक दिली. या अपघातात मोटरसायकलवरील व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना कळंबोली-जेएनपीटी मार्गावर घडली. या अपघातानंतर कंटनेर चालकाने कंटेनर त्याच ठिकाणी सोडून पलायन केले असून कामोठे पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे.

अपघातात मृत झालेल्या व्यक्तीचे नाव आदम मकानदार (वय ४६) असे असून ते पनवेलमधील करंजाडे सेक्टर-२ मध्ये राहण्यास होते. मकानदार कामानिमित्त आपल्या मोटरसायकलवरून कळंबोली येथे गेले होते. त्यानंतर दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास ते कळंबोली येथून करंजाडे येथे परतत होते. या वेळी त्यांची मोटरसायकल कळंबोली-जेएनपीटी मार्गावर खांदागाव स्मशानभूमीजवळ आली असताना पाठीमागून आलेल्या कंटेनरने त्यांना धडक दिली. या अपघातात आदम मकानदार गंभीर जखमी होऊन रस्त्यावर पडल्यानंतर कंटेनर चालकाने ताब्यातील कंटेनर सोडून पलायन केले. या वेळी इतर प्रवाशांनी जखमी आदम मकानदार यांना रुग्णालयात दाखल केले असता, तेथील डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेनंतर कामोठे पोलिसांनी कंटेनर चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# राज्यस्तरीय अधिकाऱ्यांची नवी मुंबईत दोन दिवसीय परिषद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत राज्यातील सर्व विभागीय उपायुक्त व सर्व प्रकल्प संचालक तथा जिल्हा सह अभियान संचालक यांची दोन दिवसांची राज्यस्तरीय परिषद सुरू झाली आहे.

या परिषदेच्या उद्घाटनच्या वेळी डॉ. हेमंत वसेकर म्हणाले की, कोरोनाच्या भयंकर स्थितीनंतर प्रथमच उपजीविका क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची परिषद होत आहे. या परिषदेत आपण राज्यातील ग्रामीण गरजू महिलांना मदतीचा हात देण्याची हीच योग्य वेळ आहे. संवेदनशीलतेने परिस्थिती हाताळल्यास उमेद अभियानात आपले राज्य निश्चित देशस्तरावर अग्रेसर राहील.




उद्घाटन सत्राचे प्रास्ताविक राज्य अभियान कक्षाचे अतिरिक्त संचालक परमेश्वर राऊत यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी उमेद अभियानाच्या सद्यस्थितीत ग्रामीण महिलांचे स्वयंसहायता समूहांच्या माध्यमातून उत्कृष्ट संघटन झालेले आहे. या चळवळीला योग्य दिशेने घेऊन जाण्यासाठी या दोन दिवसीय परिषदेचा आपणाला उपयोग होणार असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज्य अभियान व्यवस्थापक रामदास धुमाळे यांनी केले.

या वेळी राष्ट्रीय साधन व्यक्ती प्रगती गोखले, अवर सचिव धनवंत माळी, उपसंचालक डॉ. राजेश जोगदंड, उपसंचालक शीतल कदम यांच्यासह विभागीय उपायुक्त, प्रकल्प संचालक, राज्य कक्षातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# कर्नाळा सर्कलची वाहतूक कोंडीमुक्त दिशेने वाटचाल


**पनवेल : वार्ताहर**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पनवेल महापालिकेच्या माध्यमातून पुढाकार घेत पनवेल शहर वाहतूक कोंडीमुक्त करण्याचा निर्धार केला आहे. यासाठी वाहतूक पोलीस, पनवेल महापालिका प्रशासन, व्यापारी यांच्यासोबत वेळोवेळी बैठक घेऊन प्रायोगिक तत्त्वावर उपाययोजना करण्यात येत आहे. त्यामध्ये पहिल्या टप्प्यात टपाल नाका परिसरात अवजड वाहनांना बंदी करून एकल दिशेने वाहतूक सुरू ठेवण्यात आली. आता कर्नाळा सर्कल परिसरात पार्किंगला बंदी करण्यात आली आहे. त्यामुळे सध्या या सर्कलची वाहतूक कोंडीमुक्त होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. त्याचप्रमाणे हे सर्कल लहान करण्यात येत आहे.



पनवेल शहरातील पनवेल शहर वाहतूक शाखेच्या हद्दीतील कर्नाळा सर्कल या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज चौक, टपाल नाका, गुरुनानक चौक, आयडीबीआय बँक, भाजप पक्ष कार्यालय, रूपाली सिनेमा टॉकीज अशा विविध बाजूंनी येणारे रोड एकत्र येतात या ठिकाणी जवळच बाजारपेठ, भाजी मार्केट व बँका असल्याने अनेकदा वाहतूक कोंडी होत होती. या संदर्भात वाहतूक शाखेने विविध उपाययोजना करून तो परिसर वाहतूक कोंडी मुक्त करण्याचा संकल्प केला आहे.

कर्नाळा सर्कल हे शहराचे मध्यवर्ती ठिकाण असल्याने व या परिसरात विविध आस्थापना असल्याने सदरचा परिसर हा नेहमीच गजबजलेला असतो. कर्नाळा सर्कल हा परिसर अतिशय दाटीवाटीचा असल्याने व सदर परिसरात नागरिकांची नेहमीच जास्त वर्दळ असल्याने त्या परिसरात वाहतुकीची प्रचंड कोंडी होत असते. त्यामुळे आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास या ठिकाणी तत्काळ मदत पाठविण्यासाठी अडचण निर्माण होऊ शकते. या हेतूने वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांच्या आदेशाने कर्नाळा परिसरातील वाहतूक सुरळीत होण्याच्या दृष्टीने कर्नाळा सर्कलकडे येणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, रूपाली सिनेमा या तिन्ही बाजूंच्या रस्त्यावर कर्नाळा सर्कलपासून २० मीटर अंतरापर्यंत कोणतेही वाहन रस्त्यावर पार्क करण्यास मनाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.



यानुसार पनवेल शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक संजय नाळे यांच्या मार्गदर्शनानुसार वाहतूक पोलिसांनी या आदेशाची अंमलबजावणी करून कायदेशीर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. त्याचप्रमाणे सर्कलसुद्धा लहान करण्यात येणार असल्याने परिसर लवकरच वाहतूक कोंडीमुक्त पाहण्यास मिळणार आहे.

### गजानन दर्णेंच्या कथासंग्रहाचे प्रकाशन

**उरण : वार्ताहर**

तालुक्यातील केगाव ग्रामपंचायत हद्दीतील विनायक डोंगरआळी येथील ज्येष्ठ लेखक गजानन दर्णे यांच्या 'दोन एकर जमीन' या कथासंग्रहाचे प्रकाशन रविवारी (दि. ५) होणार आहे. त्यात एकूण १२ कथा आहेत.

दर्णे यांची वयाची नव्वदी उलांडली तरी लेखनाची जिद्द कायम असून ते गेली ७०हून अधिक वर्षे सातत्याने विविध प्रकारचे लेखन करीत आहेत. त्यांची आतापर्यंत १५ पुस्तके प्रकाशित झाली असून 'दोन एकर जमीन हे सोळावे पुस्तक आहे. कथा, कविता, प्रवास वर्णन, अनुभव लेखन असे विविध प्रकारचे साहित्य त्यांनी निर्माण केले आहे. या वयातही ते लघुकथा लिहितात. आतापर्यंत कुसुम गुच्छा, खोटी अदेली, ज्येष्ठ पर्व, देवदूत गणपतीच्या गोष्टी, कथा गणेशाच्या, महादेवाचा नंदी, अशी अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

दोन एकर जमीन या कथासंग्रहाचा प्रकाशन सोहळा केगाव-विनायक, डोंगरआळी, गजाजन बंगला विनायक येथे मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. अशी माहिती लेखक गजानन दर्णे यांनी दिली.

# नेत्रतपासणी, मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिरास वावेघरमध्ये प्रतिसाद

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा परिसरातील नागरिकांसाठी गेल्या काही वर्षांपासून मोहोपाडा येथील समर्थ नेत्रालय यांच्या वतीने परिसरात मोफत डोळे तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात येते. असेच शिबिर वावेघर येथे झाले.

रसायनी व आसपासच्या परिसरातील वावेघर, सावळा, लाडिवली, माजगाव आंबिवली, आपटा, लोधिवली, ठोंबरेवाडी, भिंगारवाडी, भोकरपाडा, पोयंजे आदी ठिकाणी डोळे तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर याअगोदर घेण्यात आले आहे. सध्याच्या युगात डोळ्यांचे ऑपरेशन करणे परवडत नसल्याने मोहोपाडा येथील समर्थ नेत्रालयाकडून सवलतीत सहकार्य केले जात असल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

वावेघर येथील श्री गणेश मंदिराच्या सभागृहात मोहोपाडा येथील समर्थ नेत्रालयाच्या वतीने वावेघर ग्रामपंचायत सरपंच विजय चव्हाण, माजी सरपंच गुरुनाथ माळी यांच्या सहकार्याने मोतिबिंदू आजार असणाऱ्यांसाठी सवलत देण्यात आली. यात रक्ततपासणी मोफत, औषधे व आयड्राप मोफत, लेजरद्वारे दुर्बिणीतून शस्त्रक्रिया, ऑपरेशन पूर्व व नंतर तपासणी मोफत, मोतिबिंदू ऑपरेशन चार्जेस मोफत असून फक्त लेन्स व ऑपरेशन सामान याचे अत्यल्प शुल्क घेतले जाणार असल्याचे नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. विशालाक्षी शेडबाले यांनी सांगितले.

वावेघर येथील शिबिरात परिसरातील १५७ नागरिकांनी डोळे तपासणी केली. यात ४३ नागरिकांना मोतीबिंदूचा आजार असल्याचे दिसून आले. त्यांच्यावर सवलतीच्या दरात मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याचे डॉ. विशालाक्षी शेडबाळे यांनी बोलताना सांगितले.










# भारताचा डिजिटल व्यवहारांचा अनुभव जगाच्या कामी येणार!

**भारतामध्ये वेगाने वाढत असलेले डिजिटल व्यवहार आणि ते व्यवहार शक्य करण्यासाठी उभी राहिलेली संरचना, हा भारताचा अनुभव आता अनेक देशांना खुणावतो आहे. अशा देशांना त्या देशात संरचनेची उभारणी करून देणे आणि त्या निमित्ताने काही आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांचे केंद्र म्हणून मान्यता मिळविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. तीन डिसेंबरला झालेल्या इन्फिनिटी फोरममध्ये त्याचीच प्रचिती आली.**

अर्थ प्रहर



यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)

भारतामध्ये डिजिटल व्यवहार किती वेगाने वाढत आहेत, खरोखरच नागरिक डिजिटल व्यवहार करत आहेत काय, हे पाहण्यासाठी अनेक प्रकारची आकडेवारी तपासावी लागेल. पण काही दिवसांपूर्वी समोर आलेल्या एकाच आकडेवारीने या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. डिजिटल व्यवहार करण्यामध्ये भारतीयांनी चीनवर मात केली आहे. रियल टाईम सेटलमेंट असे ज्या व्यवहारांना म्हणतात, ते भारतात २५.५ अब्ज व्यवहार होत असून चीनमध्ये ते १५.७ अब्ज इतके होतात. म्हणजे भारत डिजिटल व्यवहार होण्यात जगात प्रथम क्रमांकावर आला आहे. याचा दुसरा अर्थ असा की एवढे प्रचंड डिजिटल व्यवहार होण्यासाठीची संरचना भारतात तयार झाली आहे.

## डिजिटल संरचना तयार

ही संरचना उभी करणे, कसे शक्य झाले, हे पाहण्यासारखे आहे. डिजिटल व्यवहार हे सरकारचे धोरण असल्यामुळे त्याला सरकारी प्रोत्साहन मिळत राहिले आणि कोरोनाच्या काळात ती गरजच निर्माण झाल्याने त्याला अधिकच गती मिळाली. त्याचे दुसरे कारण म्हणजे भारताची लोकसंख्या. तिच्यासाठी काहीही करायचे असले की ते मोठ्या प्रमाणावर करावे लागते. ज्यातून कोणत्याही वस्तूची किंवा सेवेचा वापर वाढतो, म्हणजे विक्री वाढते आणि त्यामुळे त्या वस्तू आणि सेवा स्वस्त होतात. कारण त्या देण्यासाठी उत्पादकांमध्ये स्पर्धा लागते. मोबाईल फोन आणि डेटा वापराचे नेमके तेच झाले. आज देशात १.१८ अब्ज मोबाइल कनेक्शन आहेत, इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या ७० कोटींच्या घरात आहे, तर स्मार्टफोनची संख्याही ६० कोटींवर गेली आहे. महिन्याला सरासरी १२ जीबी डेटा भारतात वापरला जातो, जो जगात सर्वाधिक आहे. ही संरचना तयार झाल्यामुळे डिजिटल व्यवहार वाढत चालले आहेत.

## भारताला मिळाला आत्मविश्वास

आधार कार्ड पद्धत, युनायटेड पेमेंटस इंटरफेस (यूपीआय) आणि कोविन सारख्या ॲपमुळे डिजिटलचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. आधार कार्डमुळे सर्वसामान्य नागरिकांना सेवा देण्यासाठी देशाचे संघटन करणे सोपे झाले, त्यावर आधारित बँकिंगमुळे आर्थिक सहभागीत्व वाढविण्यास मदत झाली, तर यूपीआयमुळे रियल टाईम सेटलमेंट व्यवहार शक्य झाले. कोविनसारख्या ॲपमुळे कोरोनावरील लसीचे १२६ कोटी डोस देणे (३ डिसेंबरअखेर) शक्य झाले. डिजिटल तंत्रज्ञान वापराचा हा भारताचा अनुभव जगाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा ठरला असून आधार, यूपीआय आणिको कोविनसारख्या ॲपचा वापर आपल्याला कसा करता येईल, याची विचारणा काही देश भारताकडे करत आहेत. विकसित देशांकडून एकेकाळी तंत्रज्ञान घेणारा देश किमान डिजिटल तंत्रज्ञान जगाला देणारा देश होऊ शकतो, असा एक आत्मविश्वास भारताला आला आहे. त्यामुळेच द इंटरनॅशनल फायनान्शियल सर्व्हिसेस सेन्टर्स ॲथोरिटीने ३ डिसेंबरला घेतलेल्या इन्फिनिटी फोरममध्ये ७० देशांचे प्रतिनिधी ऑनलाईन पद्धतीने उपस्थित राहिले. भारतासाठी यानिमित्ताने एक नवे दालन उघडले आहे.


## इन्फिनिटी फोरमचे उद्घाटन

अर्थात, याची तयारी भारताने आधीपासूनच केली आहे. द इंटरनॅशनल फायनान्शियल सर्व्हिसेस सेन्टर्स ॲथोरिटीची स्थापना एप्रिल २०२०ची. गुजरातमधील गांधीनगरजवळ गिफ्टसिटीमध्ये त्याचे मुख्यालय आहे. आर्थिक उत्पादने, सेवा आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांसाठी संस्थांची उभारणी करणे, ही कामे हे प्राधिकरण करते. जगाचे आर्थिक नियंत्रण करणाऱ्या किंवा आर्थिक व्यवहारांवर वरचष्मा असणाऱ्या सर्व संस्था या विकसित देशांतील आहेत. त्या संस्था त्यांचे हितसंबंध सांभाळतात. भारताला आर्थिक मानांकनाच्या बाबतीत त्याचा फटका सहन करावा लागला आहे. या पार्श्वभूमीवर त्यातील काही व्यवहार भारतातच होऊ लागले तर! भारतासारख्या डिजिटल व्यवहाराची संरचना अजून अनेक देशांमध्ये तयार झालेली नाही. त्याचा फायदा घेऊन काही आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहार भारताकडे यावेत, या हेतूने या प्राधिकरणाचे काम सुरू आहे. त्याच्या इन्फिनिटी फोरमचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ३ डिसेंबरला केले.

### इन्फिनिटी फोरममध्ये चर्चा झालेले काही मुद्दे

- आर्थिक व्यवहारातील लाल फितीचा कारभार कमी होऊन ते सोपे आणि सुटसुटीत होतील.
- तंत्रज्ञानामुळे आर्थिक व्यवहार करताना लागणारा वेळ आणि पैसा वाचेल.
- भारताच्या या क्षेत्रातील अनुभवामुळे इतर देशांना त्यांच्या परिस्थितीनुरूप बदल करून डिजिटल संरचना तयार करून देण्याचे काम गिफ्टसिटीमध्ये होईल.
- बँकांची अनेक कामे आता ऑनलाईन होत असल्याने बँकांना अशा छोट्या कंपन्यांच्या स्पर्धेला तोंड द्यावे लागेल.
- आर्थिक सहभागीत्व वेगाने वाढविण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञान वापरण्याशिवाय पर्याय नाही.
- अधिक अंतरामुळे दुर्गम भागातील नागरिकांना आर्थिक समृद्धीच्या संधी नाकारल्या जातात, त्या संधी तंत्रज्ञानामुळे सर्वत्र उपलब्ध होतील.
- आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांचे एक केंद्र म्हणून भारताला मान्यता मिळेल.

India FinTech Forum
Fintech Policy Advocacy





## डिजिटल व्यवहारांचे अनेक पैलू

भारताशिवाय इंडोनेशिया, दक्षिण आफ्रिका आणि ब्रिटनने या फोरममध्ये पुढाकार घेतला आहे. डिजिटल व्यवहारात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या कंपन्या, बँकाचे चेअरमन आणि त्या त्या देशातील आर्थिक व्यवहारांचे संचालन करणाऱ्या संस्थांच्या प्रतिनिधी या फोरममध्ये उपस्थित होते. आर्थिक व्यवहार पारदर्शी होणे, सर्वसामान्य माणसांपर्यंत बँकिंगच्या सेवासुविधा पोहोचणे, आर्थिक व्यवहारातील मध्यस्थ कमी करणे, आणीबाणीच्या काळात सर्व नागरिकांपर्यंत मदत पोहोचविण्याचे मार्ग तयार करणे, आर्थिक व्यवहारात नागरिकांचा जाणारा प्रचंड वेळ आणि पैसा वाचविणे आणि तीच तीच कामे करण्यामध्ये जे मनुष्यबळ खर्च होते, त्यात बचत करणे, असे डिजिटल व्यवहारांना अनेक पैलू आहेत. या सर्व पैलूंनी जसे भारताला खुणावले आहे, तसेच ते आता इतर देशांनाही खुणावत आहेत. भारताने या तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यात आघाडी घेतली आहे. त्यामुळे भारताचा हा अनुभव महत्त्वाचा ठरत असून ते तंत्रज्ञान आणि तो अनुभव इतर देशांना हवा आहे.

---

**आयुष्यात आपण बचत करत असू की गुंतवणूक, सध्याच्या अस्थिर काळात विम्याला अतिशय महत्त्व आले आहे. पण विमा काढताना त्याचा प्राधान्यक्रम ठरविणे आणि कोणता विमा काढावयाचा, याचा निर्णय लवकर होत नाही. अचानक आलेल्या संकटातून बाहेर पडण्याचा दुसरा मार्ग उपलब्ध नसल्याने विम्याकडे आपण दुर्लक्ष करू शकत नाही. त्यामुळे आज आपण विम्याचे विविध प्रकार आणि आपण त्यातील काय निवडायचे, ते पाहूया.**


# जीवनाची आर्थिक घडी विस्कटू न देण्यासाठी...



प्रसाद ल. भावे
sharpadvisers@gmail.com

विम्याची गुंतवणूक म्हणजे परताव्याच्या अपेक्षेनं इन्शुरन्स पॉलिसीमध्ये केली जाणारी गुंतवणूक नसून आपल्या आर्थिक नियोजनातील एक गरजेचं, महत्त्वाचं परंतु तितकंच दुर्लक्षिलेलं अंग असून परताव्याची अपेक्षा न बाळगता यामध्ये गुंतवणूक करणं हीच आर्थिक नियोजनाची पहिली पायरी ठरते. ही अशी गोष्ट आहे की जेव्हा त्याची तुम्हाला अजिबात गरज नसते तेव्हा ती सहज मिळू शकते आणि जेव्हा त्याची खरोखर गरज असते तेव्हा तुम्हाला ती कधीच सहजासहजी मिळू शकत नाही. बहुतांशी लोक विमा व गुंतवणूक ह्या दोन वेगळ्या गोष्टींना एकच समजतात व फसवले जातात (युलिप अथवा ट्रॅडिशनल म्हटल्या गेलेल्या पॉलिसी टाळाव्यात).

ज्याप्रमाणं ‘वेल्थ’ या नावाखाली महागडी घड्याळं, महागड्या गाड्या अथवा महागडी पेंटिंग्ज देखील मोडतात



आणि जरी त्यातून आर्थिक मोबदला मिळत नसला, तरी त्या गोष्टी जवळ असणं हे श्रीमंतीचं लक्षण असतं. अगदी त्याचप्रमाणं ही गुंतवणूक परताव्यापोटी न करता मानसिक समाधानासाठीच केली जाते. याच समाधानासाठी आर्थिक पंचमहाभुतांवर विजय मिळवल्यास आर्थिक नियोजन हे उत्तम होतंच व आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर ध्येयपूर्तीचं समाधान देखील नक्कीच पदरात पडतं. आताही महाभूतं म्हणजे मृत्यू, आजारपण, अपघात, नैसर्गिक आपत्ती व इतर संकटं.

आयुर्विमा (टर्म इन्शुरन्स) : आपल्या जीवनसाथीवर व कुटुंबावर प्रेम करणारी कोणतीही व्यक्ती (नवरा असो व बायको) ही बेजबाबदार असूच शकत नाही. कुटुंबातील कमावणाऱ्या व्यक्तीच्या नसण्यानं त्याच्या उत्पन्नाएवढी रक्कम त्याच्या पश्चात त्याच्या जिवलगांना मिळणं इतकाच हेतू या विमा प्रकारचा असतो. ही रक्कम साधारणपणे वार्षिक उत्पन्नाच्या १५-१६ पट असावी. उदा. मासिक उत्पन्न ५० हजार असल्यास (५०,०००x१२=६,००,०००x१६=९६लाख) याचं कारण हे मिळालेले विम्याचे ९६ लाख कोणतीही जोखीम न घेता राष्ट्रीय बँकेच्या मुदतठेव योजनेत गुंतवल्यास येणारं मासिक व्याज हे त्या व्यक्तीच्या मासिक उत्पन्नाएवढं येतं (९६,००,००० x ६.५% = ६,२४,०००/१२=५२,०००). हा विमा नोकरी लागल्याबरोबर अथवा लग्न झाल्याबरोबर लागलीच काढावा. मिळालेल्या आहेरातून प्रथम गुंतवणूक.

आरोग्यविमा : अनेकदा कुटुंबातील एखाद्या व्यक्तीच्या आजारपणाचा खर्च आपली सर्व बचत व गुंतवणूकही घेऊन जातो आणि मग ज्या उद्दिष्टांसाठी ही गुंतवणूक केलेली असते त्यांच्याशी आपणांस तडजोड करण्याशिवाय कोणताच पर्याय नसतो. उदा. आपल्या लाडक्या मुलीच्या उच्च शिक्षणासाठी आपण गेले २५ वर्षे पोटाला चिमटा घेऊन गुंतवणूक करत असतो, परंतु अचानक उद्भवलेल्या हॉस्पिटलायझेशनमुळं त्यातील बहुतांशी रक्कम हॉस्पिटलचं बिल भरण्यात खर्च होते व उच्च शिक्षणासाठी पैसे कमी पडल्यानं मुलीच्या महत्त्वाकांक्षेशी समझोता करणं भाग पडतं. त्याच वेळेस या विम्याचं महत्त्व पटतं.

वैयक्तिक अपघात : यामध्ये कोणत्याही अपघातामुळं त्या व्यक्तीचा केवळ दुर्दैवी अंत झाल्यासच ही विमा रक्कम मिळते असं नाही तर अवयव निकामी झाल्यास देखील ही रक्कम मिळते. या रकमेव्यतिरिक्त डमिट करताना येणारा (एअर अँब्युलन्ससकट) खर्च, नातेवाईकांचा प्रवासखर्च, बेडरेस्ट असल्यास कापलेल्या सुट्ट्यांचा खर्च, अशा अनेक इतर खर्चांसह अगदी विमा असलेल्या व्यक्तीची मयत झाल्यास अंत्यविधीच्या खर्चाची देखील या प्रकारात तजवीज केलेली आहे.

गाडीचा विमा : आजकाल नवीन गाडी घेताना आणि नंतर त्याचं नूतनीकरण बंधनकारकच केलं असल्यानं आजकाल प्रत्येकाकडं हा विमा असतोच. तरी देखील हा विमा काढताना गाडीतील मौल्यवान गोष्टी देखील यात अंतर्भूत आहेत का याची खात्री करावी.

घरविमा : घराचा देखील विमा काढणं गरजेचं आहे. आपल्या फायनॅन्शिअल ड्रायजरने ही गोष्ट कितीही कानी-कपाळी ओरडून सांगितली तरी बहुतेक लोक सहजासहजी अशा प्रकारचा विमा काढताना दिसून येत नाहीत. घरकर्ज काढताना कर्ज देणाऱ्या बँकेची फॉरमॅलिटी म्हणून मात्र मुकाट्यानं तो काढला जातो. यामध्ये घरफोडी, चोरी, घराचं व त्यातील सामानाचं नुकसान, स्थलांतर खर्च इ. गोष्टी समाविष्ट असतात. कोणतंही घर सजवताना आपण ते किती कौतुकानं, कल्पकतेनं सजवत असतो, मग ड्रॉइंग रूममधील महागडे होम-डेकॉर, झुंबर, गालिचा, पडदे यांच्या रंगसंगतीपासून ब्रँडेड ऑटोमेटेड इलेक्ट्रॉनिक्स, किचनमधील सुबक पारंपरिक काच-सामान तर बेडरूममधील महागडे बेड्स-वॉर्डरोब ते अगदी थेट टेरेवरील सिटआऊट फॉर बार्बेक्यू पर्यंत. एखादी चूक, ठिणगी, अपघात किंवा पूर या गोष्टी सर्व परिश्रमांवर पाणी फिरवावयास पुरेशा ठरतात. या विमा प्रकारात घरातील प्रत्येक गोष्ट (अगदी महागडं पेंटिंग खराब होण्यापासून) तर सुरक्षित होतेच शिवाय नैसर्गिक आपत्तीमुळं झालेलं आर्थिक नुकसान देखील परत मिळवता येतं.

आज विमा काढताना केवळ त्याचा प्रीमियम कमी असल्यास अशा कंपनीकडून विमा काढला जातो. परंतु प्रीमियमकडं न पाहता त्या पॉलिसीमधून आपले उद्देश योग्यप्रकारे व निश्चितपणे साध्य होतील का हे तपासावं आणि त्याजबरोबरीनं प्रीमियम जास्त येतोय म्हणून एखादी गोष्ट लपवणं किंवा खोटं सांगणं हे ती विमा पॉलिसी न घेण्यासारखंच आहे. म्हणून माझं असं मत आहे की, विमा एजंट हा एकतर विश्वासार्ह हवा मग तो ओळखीतला नसेल तरी चालू शकेल. खासकरून संपूर्ण आर्थिक सल्लागार असेल तर उत्तमच. याचं कारण म्हणजे एकतर तो स्वतःच्या फायद्यासाठी तुम्हाला फसवणार नाही व तुमची आर्थिक गणितं त्यांना चांगली माहीत असल्यानं त्यात कुठं तडजोड करायची व कुठं आग्रहानं विमा काढायचा याची सांगड उत्तमप्रकारे आणि तेही योग्य वेळी घालणं हे त्यांचं कर्तव्य समजून ते तो जबाबदारीनं पार पाडेल. वरील प्रमुख पाच विमाप्रकारांव्यतिरिक्त इतरही काही विमा प्रकार आढळतात, परंतु ‘मस्ट’ या सदराखाली ह्या पाच विम्यांद्वारे सुरक्षित झाल्यास व त्यासाठी लागणारी प्रीमियम रक्कम ही योग्य आर्थिक नियोजन करताना दरमहा बाजूला काढल्यास कोणतेही संकट तुमच्या आर्थिक गुंतवणुकीस खिंडार पाडू शकत नाही हे नक्की. त्यामुळं ठरवलेली गुंतवणूक योग्य साधनांत करत राहिल्यास आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर ध्येयपूर्ती होऊन आर्थिक समाधान मिळणारच आणि मग सरतेशेवटी आपण नक्कीच आनंदानं म्हणू शकतो, चला आयुष्यावर बोलू कांही...

# सुधागड तालुक्यात गुरे चोरट्यांची टोळी सक्रिय

## शेतकऱ्यांची पोलीस ठाण्यात धाव, तक्रार दाखल

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील शेतकऱ्यांची गुरे मध्यरात्रीच्या सुमारास चोरीला जात असल्याने शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. गुरे चोरणारी टोळी सक्रिय झाली असून आजवर शेकडो गुरे चोरीला गेल्याची तक्रार व ओरड सुधागड तालुक्यातील शेतकरी परशुराम हाशा निरगुडा व अन्य शेतकरी करीत आहेत. गुरे चोरीचे प्रमाण मागील वर्षभरात थांबले होते, मात्र या गुरे चोरी प्रकाराला पुन्हा पेव फुटल्याने ग्रामीण भागात भीतीचे वातावरण पसरले आहे.

सुधागड तालुक्यातील परळी जांभुळपाडा विभागात गुरांना गुंगीचे इंजेक्शन देऊन बेशुद्ध करून चारचाकी वाहनातून मोकाट गुरे चोरणारी टोळी सध्या कार्यरत झाली आहे. या संदर्भात शेतकरी एकवटले असून अज्ञात टोळी गुरे चोरत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी जांभूळपाडा पोलीस ठाण्यात दिली असून संबंधितांवर कारवाईची मागणी केली आहे. त्यानंतर आता या गुरे चोरीला आळा घालण्याचे व चोरट्यांच्या मुसक्या आवळण्याचे मोठे आव्हान पोलिसांपुढे उभे ठाकले आहे. कसईशेत, पो. हातोंड येथील शेतकरी परशुराम हाशा निरगुडा यांनी शुक्रवारी (दि. ३) दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की माझ्या मालकीच्या वाड्याच्या रिकाम्या मोकळ्या जागेत स्वतःच्या मालकीची व गावाच्या इतर शेतकऱ्यांची दिवसभर चरायला गेलेली गुरे विश्रांतीला बसतात, हा दैनंदिन उपक्रम आहे, मात्र पहाटेच्या सुमारास गुरांचा आरडाओरडा झाल्याची बाब एका ग्रामस्थाने घरी येऊन सांगितल्यावर शेतकरी गुरांच्या ठिकाणी धावले, मात्र गुरे बेपत्ता असल्याचे निदर्शनास आले. काही गुरे बेशुद्धावस्थेत आढळली. गुरे चोरीला गेल्याची खात्री झाली. यानंतर शेतकऱ्यांनी पोलिसांत धाव घेतली. यामध्ये परशुराम निरगुडा यांची दोन गुरे, लिंबाजी निरगुडा यांची दोन गुरे, नारायण वाघमारे यांची दोन गुरे, झिमा ठोंबरे यांचे एक व वामन वाघमारे यांचे एक अशी गुरे चोरीला गेल्याची तक्रार शेतकऱ्यांनी पोलीस स्थानकात केली आहे.

(छाया : धम्मशील सावंत)



सुधागड तालुका हा आदिवासी बहुल व कष्टकरी, श्रमजीवी व शेतकरी वर्गाचा समावेश असलेला कृषिप्रधान तालुका आहे. या ठिकाणी शेती व्यवसायबरोबर पशुपालन व दुग्धव्यवसाय केला जातो. अशातच गुरांच्या किमती वाढल्याने एखादे गाय अथवा बैल दगावला अथवा चोरीला गेला, तर गोरगरीब सामान्य शेतकऱ्यावर आभाळ कोसळते. त्यामुळे गुरे चोरणाऱ्या टोळीचा पर्दापाश करून त्यांना जेरबंद करावे, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे. या वेळी परशुराम हाशा निरगुडा, भिवा हीरू शिद, गोमा पदू ठोंबरे, उपसरपंच पंकज पाठारे, सदस्य रमेश वाघमारे, माजी उपसरपंच रमेश पाठारे, जगन्नाथ पाठारे, रवींद्र चौधरी, नारायण वाघमारे, पदू वाघमारे, सोमा शिद आदींसह शेकडो शेतकऱ्यांनी जांभुळ पाडा पोलीस दूरक्षेत्रात उपस्थित राहून तक्रार दिली.

> *शेतकऱ्यांची गुरे चोरीला जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार संशयित व अज्ञात व्यक्तीवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गुरे चोरीला आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाने नाकाबंदीसह आवश्यक ती उपाययोजना करण्यावर भर दिला आहे, मध्यरात्री महत्त्वाच्या ठिकाणी नाकाबंदी केली जाणार आहे. तसेच ग्रामीण भागात पोलीस व्हॅन गस्त घालणार आहे. मध्यरात्री येणारी संशयास्पद वाहने तपासली जातील. बाहेरच्या वाहनांवर करडी नजर ठेवली जाईल. तसेच काही ग्रामपंचायतींना महत्त्वाच्या व मोक्याच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे आवाहन पोलीस प्रशासनामार्फत केले आहे.*
>
> *–विजय तायडे, पोलीस निरीक्षक पाली सुधागड*

# कळंब–पाषाणे–वांगणी रस्त्याची दुरवस्था

## एसटी बंद; विद्यार्थ्यांचे हाल

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील महत्त्वाचा समाजाला जाणारा कळंब–पाषाणे–वांगणी रस्त्याची दुरवस्था झाली आहे. यापूर्वीच्या ठेकेदाराने रस्त्याचे काम नित्कृष्ट दर्जाचे केले आहे आणि त्यामुळे अल्पवधीत रस्ता खराब झाला. दरम्यान, खराब रस्त्यामुळे कर्जत आगाराने एसटी गाड्या बंद केल्या आहेत. परिणामी विद्यार्थी आणि नोकरदार यांचे प्रचंड हाल होत असून आधी रस्त्याची डागडुगी करावी, अशी मागणी साळोख गावच्या रहिवाशांनी केली आहे.

मागणी मान्य न झाल्यास प्रथम रस्ता रोको आणि नंतर उपोषण करण्याचा इशारा पंचक्रोशीतील साळोख, कळंब, पाषाणे ग्रामपंचायतीमधील रहिवाशांनी दिला आहे. तालुक्यातील प्रमुख जिल्हामार्ग आणि जिल्हा परिषदेच्या मालकीचे रस्ते यांचा विचार केला तर त्यांची अवस्था खड्ड्याबाबत अजिबात चांगली नाही. त्यातील जास्त रहदारी असलेल्या कळंब–पाषाणे–वांगणी रस्त्यावरील एका मोठ्या पुलावरून अवजड वाहनांसाठी वाहतूक बंद केली आहे, तर मागील वर्षात तब्बल चार कोटी खर्च करून देखील या रस्त्याची अवस्था पाहून निधी वाहून गेला, असे म्हणण्याची वेळ आली आहे. या रस्त्याचे काम चांगले व्हावे म्हणून जिल्हा परिषदेचे दिवंगत सदस्य सुदाम पेमारे यांनी स्थानिकांच्या मदतीने एक फोरम उभा केला होता, मात्र त्यालादेखील या रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराने जुमानले नाही. त्याच वेळी रस्ता खराब असल्याने या रस्त्याने वाहतूक होणारी एसटीदेखील परिवहन मंडळाला बंद करावी लागली. याच भागात असलेल्या बोरगावकडे जाणारा रस्तादेखील मोठमोठ्या खड्ड्यांनी व्यापला आहे.



कर्जत तालुक्यातील कळंब भागातील रहिवाशांना वांगणी रेल्वेस्थानकात पोहचण्यासाठी जवळचा असलेला रस्ता मंदावला आहे. त्या पाईप मोऱ्या ३० वर्षापूर्वी रस्त्याचे बांधकाम करण्यात आले तेव्हा बसविण्यात आले होते, मात्र मागील १० वर्षात तब्बल दोन वेळा रस्त्याचे डांबरीकरण करताना कोणीही त्या पाईप मोरीकडे पाहायला बांधकाम विभागाला वेळ मिळाला नाही. पावसामुळे त्या मोरीला भगदाड आणि खराब रस्ता यामुळे एसटी गाड्यांची वाहतूक बंद झाली आहे. त्यामुळे कळंब भागातील रहिवासी, विद्यार्थी, नोकरदार यांना वांगणी येथे उपनगरीय लोकल पकडण्यासाठी जाताना मोठी कसरत करावी लागत आहे. त्या सर्वांना नेरळ येथे येऊन लोकल पकडावी लागते.त्यासाठी लागणारा फेरा यामुळे प्रवास, वेळ, इंधन यांचा भारदेखील वाढत असून त्यावर पडलेल्या भगदाडाबद्दल माले गावातील ग्रामस्थ माजी सरपंच जयवंत वेहेले यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि रायगड जिल्हा परिषद यांना कळविले आहे, पण बांधकाम विभाग या रस्त्याकडे लक्ष देताना दिसत नाही.

# माणगावमध्ये गोरक्षा गो संवर्धन समितीचा महामोर्चा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील वाढत्या गोवंश हत्या, गोमांस तस्करी आणि गोधनचोरी याला शासन व प्रशासनाने आळा घालावा. तस्कर व चोरांना कठोर शासन करावे याकरिता माणगाव तालुका गोरक्षा व गो संवर्धन समितीकडून शुक्रवारी (दि. ३) माणगाव बालाजी मंदिर ते प्रांताधिकारी कार्यालय माणगांवपर्यंत महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.



> निजामपूर बाजारपेठेत पाळला बंद कडकडीत

या वेळी माणगाव तालुका गोरक्षा समिती सचिव प्रदीप कदम, अध्यक्ष ॲड. अनिकेत ठाकूर, उपाध्यक्ष परशुराम कोदे, संजोग मानकर, प्रसाद जाधव यांच्यासह इंदापूर, निजामपूर, साई मोर्बा व लोणेरे विभागातून असंख्य शेतकरी, गोरक्षक आणि हिंदू समाज बांधव उपस्थित होते.

या मोर्चात समस्त हिंदू समाज व गोप्रेमी यांनी कोरोना प्रतिबंधात्मक नियमावली पाळून मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन माणगाव तालुका गोरक्षा समितीकडून करण्यात आले होते. त्यानुसार गोप्रेमी व हिंदू बांधव उपस्थित होते. कायदा व सुव्यवस्था राखत अगदी शांतपणे हा मोर्चा पार पडला. माणगाव प्रांताधिकारी यांच्या प्रतिनिधीला निवेदन देण्यात आले. या वेळी पोलीस बंदोबस्त देखील चोख ठेवण्यात आला होता.

याच पार्श्वभूमीवर निजामपूर विभागात पाळीव पशू उदा. म्हैस व गुरे दावणीचे दोर कापून चोरून नेऊन कत्तल करण्यात आली होती. रस्त्यावरील जनावरांना भुलीचे इंजेक्शन देऊन पळवून कत्तल करण्यात आली होती व गाभण गायीची कत्तल करून अर्भक व सांगाडा उघड्यावर फेकण्यात आला होता. याच्या निषेधार्थ आज महामोर्चाच्या दिवशी निजामपूर बाजारपेठेत बंद पाळण्यात आला होता. १००% निजामपूर बाजारपेठ बंद ठेवण्यात आली होती.

# कालवण येथून डिझेल इंजिनची चोरी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील कालवण येथून किर्लोस्कर कंपनीचे डिझेल इंजिन अंदाजित किंमत २० हजार रुपये चोरून अज्ञात चोरटा पसार झाला आहे. याबाबतची फिर्याद सचिन ज्ञानेश्वर म्हात्रे (वय ४०, रा. साईनगर, माणगाव) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

सदर गुन्ह्याबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, घटनेतील फिर्यादी सचिन म्हात्रे यांच्या मालकीच्या असलेल्या किर्लोस्कर कंपनीचे डिझेल इंजिन अंदाजे किंमत २० हजार रुपये हे अज्ञात चोरट्याने चोरून तो पसार झाला आहे. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात भा. दं. वि. कलम ३७९ प्रमाणे करून अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक अश्वनाथ खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार श्री. दोडकुळकर हे करीत आहेत.

# फर्निचर कंपनीत चोरी करणाऱ्यांना पेण पोलिसांनी केले गजाआड

**पेण : प्रतिनिधी**

पेण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पेण खोपोली मार्गावरील गागोदे येथील बंद असलेल्या व्हेक्टर मॉविलर फर्निचर कंपनीच्या गोडावूनचे शेटर तोडून व काचा तोडून कंपनीतील लाखो रुपयांच्या साहित्याची चोरी करणाऱ्या चोरट्यांना पेण पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे.

पेण–खोपोली रोडवर गागोदे गावच्या हद्दीत व्हेक्टर मॉविलरही कंपनी असून ही कंपनी बंद अवस्थेत आहे. याचा फायदा घेत २५ ऑक्टोबर २०२१ ते २६ नोव्हेंबर २०२१च्या दरम्यान चोरट्यांनी कंपनीचे शटर तोडून लाखो रुपयांचे साहित्य चोरून नेले. यानंतर फिर्यादी दीपक यशवंत बागाव (वय ६१, रा. ब्राह्मण सोसायटी, नवपाडा, ठाणे) यांनी शुक्रवारी (दि. २६) पेण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर डीवायएसपी विभा शिंदे व पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाची चक्रे वेगाने फिरवली.

पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र पाटील, हवालदार राजा पाटील, राजेंद्र



भोनकर, संतोष जाधव. पोलीस नाईक कैलास बेल्हेकर यांच्या पथकाने विविध माध्यमातून शोध घेत चार आरोपींना मुंबईमधील गोवंडी येथून ताब्यात घेतले. यामध्ये आरोपींकडून पोलिसांनी चोरून नेलेले लाखो रुपयाचे साहित्य व चोरी करण्यासाठी वापरलेली तीन वाहने जप्त केली.

या प्रकरणात पोलिसांनी सत्तार अकबरअली शेख (३७, रा. गोवंडी, मुंबई), राजेश छोटेलाल राजभर (३५, रा. मानखुर्द, मुंबई), परवेज आलम मोहम्मद अली शेख (२६, रा. गोवंडी, मुंबई), नसरुद्दीन मुजफ्फर अली अन्सारी (२३, रा. गोवंडी, मुंबई), मोहम्मद कमाल रऊफ खान (२६, रा. बैंगनवाडी, गोवंडी, मुंबई), अहमद हसिबुद्दिन शेख (२५, रा. बैंगनवाडी, गोवंडी), महमद आरिफ मोहम्मद मुनीर (३३, रा. मानखुर्द, मुंबई) अशा सात आरोपींना अटक केली आहे. याप्रकरणी आरोपी रुस्तम, अन्वर व नूर हे तीन आरोपी अद्यापही फरारी आहेत. त्यांचा तपास पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र पाटील व त्यांची टीम घेत आहे.

काही दिवसांतच पोलिसांनी या चोरीचा तपास लावल्याबद्दल वरिष्ठांकडून तपास पथकाचे कौतुक करण्यात येत आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत **मे. सिटीओपिया व्हेंचर प्रा. लि. तर्फे प्रशांत प्रभाकर पाटेकर** यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीच्या मालकी हक्काची खात्री करून घेण्याकरीता सदर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

**परिशिष्ट**

**मौजे – पळस्पे, तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड.**

| गट नं. / हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ५९/१ | ०–४०–५०<br>पो.ख. ०–०४–१०<br>**एकूण ०–४४–६०** | ९.८२ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधित व्यक्ती, सरकारी/निमसरकारी/खाजगी संस्था यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ०४/१२/२०२१.**

**सही/–**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट,
वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ
अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
दूरध्वनी क्र. २७४५६३०६


# टीएमसी कॉलेजमध्ये एचआयव्ही तपासणी शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीचे टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये एड्स जनजागृती सप्ताहानिमित्त शुक्रवारी (दि. ३) सकाळी १० ते २ वाजेपर्यंत राष्ट्रीय सेवा योजना व डी.एफ.एफ.ई. विभागांतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची एचआयव्ही तपासणी कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून माणगाव उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रदीप इंगोले, सौ. खेडेकर,सौ. राजपूत, संस्थेचे सचिव नानासाहेब सावंत, रामदास पुराणिक, प्राचार्य डॉ. संध्या कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा. हर्षल जोशी, प्रा. डॉ. माळी, प्रा. पवार, ग्रंथपाल अमित बाकाडे, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

एचआयव्ही तपासणीसाठी ५० विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. पुढील आठवड्यात राहिलेल्या सर्व विद्यार्थ्यांची एचआयव्ही टेस्ट करण्यात येईल, असे प्राचार्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. जोशी यांनी केले, तर या कार्यक्रमासाठी अमित बाकाडे व सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# चौक येथे रक्त तपासणी शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

चौक ग्रामीण रुग्णालयातर्फे मोफत रक्त तपासणी शिबिराचे आयोजन जागतिक एड्स दिनानिमित्त वावोशी या ठिकाणी आयसीटीसी विभाग ग्रामीण रुग्णालय, चौक, आधार संस्था पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. या वेळी भाटे राजे साईडवर १२५ कर्मचारी व अधिकारी यांची एचआयव्ही चाचणी करण्यात आली.

समुपदेशक अशोक लोंढे यांनी उपस्थित कर्मचारी व अधिकारी यांना जागतिक एड्स दिनानिमित्त एचआयव्हीची कारणे, लक्षणे, एआरटी उपचार पद्धती व टीबीची कारणे, लक्षणे, उपचारपद्धती, आजारांविषयी माहिती दिली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामीण रुग्णालय समुपदेशक अशोक लोंढे, लॅब टेक्निशियन विकास घुमरे, आधार संस्थेच्या मेघा मॅडम, भगवान सावंत, भाटे राजे साईडचे स्वप्नील पाटील, आधार हॉस्पिटल पनवेलचे सदस्य यांचे विशेष सहकार्य लाभले.




## श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ

नोंदणी क्र. : महाराष्ट्र १२२/९६ (रायगड)

### वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना

**(फक्त सभासदांकरिता)**

दिनांक : ०४/१२/२०२१

आपणास कळविण्यात येते की, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाची सव्वीसावी वार्षिक सर्वसाधाण सभा गुरुवार दिनांक ३०/१२/२०२१ सायंकाळी. ६.०० वाजता चांगु काना ठाकूर आर्टस् कॅमर्स अँड सायन्स कॉलेज ऑटोनॉमस रुम नं. ०४ स्किल डेव्हलपमेंट सेंटर प्लॉट नं. ०१ सेक्टर ११ खांदा कॉलनी नवीन पनवेल येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदर सभेला आपण उपस्थित राहण्यास विनंती आहे.

**✻ सभेचे विषय ✻**

१) मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२) मागील सर्वसाधारण सभेपासून आजपर्यंत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयांना व त्यावर केलेल्या कार्यवाहीला मंजुरी देणे.
३) मागील सर्वसाधारण सभेपासून आजपर्यंत रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्टस् कॉम्प्लेक्सविषयी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांना व त्यावर केलेल्या कार्यवाहीला मंजुरी देणे.
४) श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे २०२०–२०२१ या वर्षाचे हिशेब तपासनिसांनी प्रमाणित केलेले जमाखर्च व ताळेबंद व हिशेब वाचून मंजूर करणे.
५) सन २०२१–२०२२च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
६) सन २०२१–२०२२ करिता हिशेब तपासनिसाची नेमणूक करणे.
९) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेस आलेल्या विषयांवर चर्चा करणे.

**आपला विश्वासू,**
**सही/–**
**प्रशांत ठाकूर**
**अध्यक्ष**
**श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ**

**विशेष सूचना :**

१) गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास तीच सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर त्याच कामाचा विचार करण्यासाठी भरविण्यात येईल व अशा पुन्हा भरलेल्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.
२) कोणत्याही सभासदास हिशेबासंबंधी काही माहिती हवी असल्यास त्याने ती लेखी स्वरुपात संस्थेच्या कार्यालयात सभेपूर्वी सात दिवस आधी कळवावी.
३) संस्थेच्या सभासदांनी बदललेले पत्ते संस्थेस लेखी कळवावे.



## TEACHERS REQUIRED

**ST.Xaviers' English High School, Durga- Vihar Kon,**

Required qualified and experienced TEACHERS FOR COMMUNICATION SKILLS IN ENGLISH, HSC , D.T.Ed/D. Ed , B.A / B.Sc, B.Ed / B.P.Ed / M.A,M. COM, M.Sc B.Ed / AM / ATD for St. Xaviers

English High School, Durga Vihar Kon, Post - Ajiwali, Tal - Panvel Dist - Raigad - 410206. Located on old Mumbai Pune Highway and 5 Kms away from Panvel. Interested candidate should approach to school with Bio-Data between 9.30 am to 1.p.m from Monday to Friday or apply by post immediately.

sign/-
H.M
Stx. E. H. School
Kon-Panvel

# टीम इंडियाने 'किवीं'ना गुंडाळले

## ■ न्यूझीलंडचा ६२ धावांत खुर्दा; दुसऱ्या डावातही भारताची दमदार सुरुवात

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत-न्यूझीलंड दुसऱ्या कसोटीचा दुसरा दिवस हा गोलंदाजांनी गाजवला. मयांक अग्रवालचे दीडशतक व अक्षर पटेलच्या अर्धशतकाने भारताचा डाव सावरला. मुंबईच्या खेळपट्टीवर एजाझचा करिष्मा चालला तिथे भारतीय गोलंदाजही चमकले. मोहम्मद सिराजने सुरुवातीला जबरदस्त धक्के दिले आणि नंतर रविचंद्रन अश्विनसह अन्य फिरकीपटूंनी त्याला चांगली साथ दिली. त्यामुळे 'किवीं'चा पहिला डाव अवघ्या ६२ धावांत गुंडाळण्यात टीम इंडियाला यश आले. त्यानंतर भारताने पाहुण्यांना फॉलोऑन न देता पुन्हा फलंदाजीचा निर्णय घेतला. दुसऱ्या दिवसाअखेर भारताच्या बिनबाद ६९




धावा झाल्या आहेत. सलामीवीर मयांक अग्रवाल ३८, तर चेतेश्वर पुजारा २९ धावांवर नाबाद आहेत.

भारताने ४ बाद २२१ वरून शनिवारी डावाची सुरुवात केली, पण दुसऱ्या दिवसाच्या पहिल्याच षटकात एजाजने साहाला (२७) पायचीत केले अन् पुढच्याच चेंडूवर अश्विनला अप्रतिम चेंडूवर त्रिफळाचीत केले. अक्षर व मयांक यांनी सातव्या विकेटसाठी दमदार खेळ केला. मयांक ३११ चेंडूंत १७ चौकार व चार षटकारांसह १५० धावांवर एजाझच्या गोलंदाजीवर माघारी परतला. अक्षरने ११३ चेंडूंत कसोटीतील पहिले अर्धशतक पूर्ण केले. एजाजनेच अक्षरला ५२ धावांवर पायचीत केले. त्यानंतर जयंत यादव व मोहम्मद सिराज यांची विकेट घेत एजाझने इतिहास रचला. भारताचा पहिला डाव ३२५ धावांवर संपला. एजाझनं ४७.५ षटकांत ११९ धावांत १० विकेट्स घेतल्या.

इशांत शर्माच्या जागी संघात स्थान पटकावलेल्या मोहम्मद सिराजने पहिल्या स्पेलमध्ये चार षटकांत १९ धावा देताना तीन विकेट्स घेतल्या. त्यानंतर अक्षर पटेल व जयंत यादव धक्के देतच होते, पण अनुभवी अश्विनने चार विकेट्स घेतल्या. भारताने पहिल्या डावात २६३ धावांची आघाडी घेतली आहे.

### 'मुंबईकर' एजाज पटेलचे एका डावात १० बळी

*न्यूझीलंडचा 'मुंबईकर' फिरकीपटू एजाज पटेलने वानखेडे मैदानावर मोठ्या विक्रमाची नोंद केली आहे. भारताविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात एजाजने एका डावात १० बळी घेत दिग्गज फिरकीपटू अनिल कुंबळेच्या पंगतीत स्थान मिळवले आहे. एका डावात अशी कामगिरी करणारा पटेल हा कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील तिसरा गोलंदाज ठरला. कुंबळे आणि एजाजव्यतिरिक्त इंग्लंडच्या जिम लेकर यांनी हा विक्रम पहिल्यांदा रचला होता. कसोटीच्या एका डावात १० बळी घेण्याचा पराक्रम फिरकी गोलंदाजांनीच केला आहे, पण पहिल्यांदाच एखाद्या गोलंदाजाने घराबाहेर हा पराक्रम केला आहे. याआधी कुंबळे (१९९९) आणि लेकर (१९५६) यांनी घरच्या मैदानावर ही कामगिरी केली होती. न्यूझीलंडकडून आतापर्यंत रिचर्ड हेडलीने सर्वाधिक नऊ बळी घेतले होते. हा विक्रमसुद्धा पटेलने मोडीत काढला.*

## भारताची 'सुवर्ण'संधी हुकली; हॉकीत पदकाची आस कायम!

**भुवनेश्वर : वृत्तसंस्था**

एफआयएच ज्युनियर पुरुष हॉकी वर्ल्ड कप २०२१ दुसऱ्यांदा जिंकण्याचे भारताचे स्वप्न भंगले आहे. जर्मनीने भारताचा ४-२ असा पराभव केला. सहा वेळा चॅम्पियन असलेल्या जर्मनीची अंतिम फेरीत अर्जेंटिनाशी गाठ पडणार आहे. भारताची सुवर्णसंधी हुकली असली तरी कांस्यपदक जिंकण्याची संधी आहे. फ्रान्सविरुद्ध विजय मिळवल्यास भारताला कांस्यपदक मिळेल.

लखनऊमध्ये २०१६मध्ये ज्युनिअर वर्ल्डकप जिंकलेल्या भारताला या वेळी जर्मनीविरुद्ध मात्र फारशी चमक दाखवता आली नाही. त्यामुळे जर्मनीविरुद्ध भारतावर दबाव निर्माण झाला. जर्मनीकडून एरिक क्लेनलेन, एरोन फ्लॅटन, कर्णधार हेन्स मुलर, ख्रिस्तोफर कुटर यांनी, तर भारताकडून उत्तम सिंह आणि बॉबी सिंह धामी यांनी गोल केले.

भारतीय संघाने क्वार्टर फायनलमध्ये बेल्जियमविरुद्ध चांगली कामगिरी केली होती. बचाव फळीत जबरदस्त कामगिरी करीत बेल्जियमला नमवले, मात्र जर्मनीविरुद्ध बचावात भारत कमी पडला.

## टीम इंडिया द. आफ्रिका दौरा करणार

### ■ बीसीसीआयची माहिती; टी-२० सामने मात्र लांबणीवर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) सचिव जय शाह यांनी टीम इंडिया वेळेवर दक्षिण आफ्रिकेचा दौरा करणार असल्याची पुष्टी केली आहे. शाह यांनी शनिवारी (दि. ४) सांगितले की, या दौऱ्यात भारत तीन कसोटी आणि तीन एकदिवसीय सामने खेळणार आहे. या मालिकेत चार टी-२० आंतरराष्ट्रीय सामनेही खेळवले जाणार होते, मात्र आता त्यांची तारीख नंतर ठरवली जाईल.

शाह यांनी एएनआयला सांगितले, बीसीसीआयने दक्षिण आफ्रिकन क्रिकेट बोर्डाला (सीएसए) पुष्टी केली आहे की, भारतीय संघ सध्या तीन कसोटी आणि तीन एकदिवसीय सामन्यांसाठी दौरा करणार आहे. उर्वरित चार टी-२० सामने सध्या खेळवले जाणार नाहीत. त्यांच्या




तारखा नंतर जाहीर केल्या जातील. दरम्यान, सुरक्षेच्या दृष्टीने भारतीय खेळाडूंना कठोर क्वारंटाइनमधून जावे लागण्याची शक्यता आहे.

दक्षिण आफ्रिकेत ओमायक्रॉनची प्रकरणे सातत्याने वाढत आहेत. याचा धोका पाहता दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर शंका उपस्थित केली जात होती. द. आफ्रिकेच्या गोटेंग प्रांतात या विषाणूशी संबंधित अनेक प्रकरणे समोर आली आहेत. एवढेच नाही तर मोठ्या संख्येने लोक रुग्णालयात दाखल आहेत. या प्रांतात भारताला दोन कसोटी सामने खेळायचे आहेत.

नेदरलँड संघाने अलीकडेच सेंच्युरियन येथे पहिला सामना खेळल्यानंतर तीन एकदिवसीय सामन्यांचा दौरा छोटा केला होता, तर युरोपियन युनियनच्या अनेक देशांनी दक्षिण आफ्रिकेवर प्रवासी निर्बंध लादले आहेत. भारत अ संघ मात्र त्यांच्या तीन सामन्यांसाठी ब्लोमफॉन्टेनमध्ये थांबला आहे. मालिकेतील दुसरी कसोटी शुक्रवारी संपली आणि तिसरी अनधिकृत कसोटी सोमवारपासून सुरू होणार आहे.

### असा आहे कार्यक्रम

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात १७ डिसेंबरपासून पहिला कसोटी सामना खेळवला जाणार आहे. यानंतर सेंच्युरियनमध्ये दुसरा कसोटी सामना २६ डिसेंबरपासून सुरू होईल आणि तिसरा कसोटी सामना पुढील वर्षी ३ जानेवारीपासून केपटाऊनमध्ये सुरू होईल. मालिकेतील पहिला एकदिवसीय सामना ११ जानेवारीला, दुसरा एकदिवसीय सामना १४ जानेवारीला आणि तिसरा एकदिवसीय सामना १६ जानेवारीला खेळवला जाईल. ओमायक्रॉन या कोरोनाच्या नवीन प्रकारामुळे हा दौरा छोटा करावा लागला.

## आरोग्य प्रहर

### थंडीच्या दिवसांत 'आळशी' ठरेल अतिशय गुणकारी

थंडीच्या मोसमात शरीराची काळजी घेणे खूप गरजेचे आहे, कारण थोडासा निष्काळजीपणा तुम्हाला या काळात आजारी बनवू शकतो. आज आम्ही तुम्हाला आळशीच्या बियांचे फायदे सांगणार आहोत. आळशी अर्थात फ्लॅक्ससीड प्रभावाने उष्ण आहे आणि औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण आहे. आळशी सर्व रोगांपासून बचाव करण्यासाठी उपयुक्त मानले जाते.



आळशी बॅड कोलेस्टेरॉल नियंत्रित करण्यास मदत करते. आळशीचे दररोज सेवन केल्याने कोलेस्ट्रॉलची पातळी ६ ते ११ टक्क्यांनी कमी होऊ शकते. याच्या सेवनाने हृदयाचे ठोके सामान्य राहतात. अशाप्रकारे आळशी 'हार्ट फ्रेंडली' असल्याचे म्हटले जाते.

व्हिटॅमिन बी-१, प्रथिने, तांबे, मँगनीज, ओमेगा-३ आम्ल, लिग्नॅन्स यासह अनेक सूक्ष्म पोषक तत्त्वे आळशीमध्ये मुबलक प्रमाणात आढळतात. मधुमेहाच्या रुग्णांसाठी आळशी खूप फायदेशीर आहे. यामध्ये असलेले फायबर आणि ओमेगा-३ आम्ल शरीरातील साखरेची पातळी नियंत्रित करतात. दररोज सकाळी रिकाम्या पोटी आणि झोपेच्या वेळी एक चमचा आळशी घेणे खूप फायदेशीर ठरते.

आजकाल लठ्ठपणामुळे लोकांना अनेक आजार होतात. आळशीमध्ये फायबर मुबलक प्रमाणात आढळते. याशिवाय, असे अनेक पोषक घटक आहेत, जे लठ्ठपणा नियंत्रित करण्यासाठी उपयुक्त मानले जातात. यासोबतच ते खाल्ल्याने पचनक्रियाही सुधारते.

आळशीमध्ये सांधेदुखीविरोधी गुणधर्म असतात. संधिवातच्या रुग्णांनी दररोज आळशीचे सेवन केल्याने खूप फायदा होतो. यासाठी तुम्ही रोज भाजलेली आळशी खाऊ शकता किंवा तो बारीक करून दुधासोबत सेवन करू शकता. याशिवाय हिवाळ्यात आळशीचे लाडूही खाता येतात.


असे म्हणतात की, ज्या महिला आळशीचे नियमित सेवन करतात, त्यांना मासिक पाळीत अधिक त्रास सहन करावा लागत नाही. हार्मोनल असंतुलनाची समस्या दूर करण्यासाठी आळशीच्या बिया उपयुक्त मानल्या जातात.

## जय शाहांच्या संघाचा गांगुलीच्या संघावर एक धावेने रोमहर्षक विजय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) दोन संघांमध्ये रंजक सामना खेळला गेला. कोलकाताच्या ईडन गार्डन्स मैदानावर सौरव गांगुली आणि जय शाह यांच्या अनुक्रमे बीसीसीआय अध्यक्ष इलेव्हन आणि बीसीसीआय सचिव इलेव्हन असे दोन संघ आमनेसामने आले. यात शाह यांच्या संघाने गांगुलीच्या संघाचा एका धावेने पराभव केला.

प्रदीर्घ कालावधीनंतर मैदानात उतरलेल्या गांगुलीने दमदार फलंदाजी करताना ३५ धावांची शानदार खेळी केली, मात्र या रोमांचक सामन्यात शाहांच्या संघाला एका धावेने विजय



मिळवण्यात यश आले. प्रथम फलंदाजी करताना शाहा यांच्या संघाने तीन गडी गमावून १२८ धावा केल्या. संघासाठी जयदेव शाह यांनी ४० धावा केल्या, तर अरुण धुमाळ यांनी ३६ धावांची खेळी केली. त्याच वेळी बीसीसीआयचे सचिव शाह १० धावांवर नाबाद राहिले. गांगुलीने १९ धावांत एक विकेट घेतली.

गांगुलीच्या संघाला सामना जिंकण्यासाठी १२९ धावांचे लक्ष्य मिळाले होते. या सामन्यात सहाव्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आलेल्या गांगुलीने जोरदार फलंदाजी केली. यादरम्यान त्याच्या ऑफ साइडमध्ये अनेक ट्रेड मार्क स्ट्रोक दिसले. या सामन्यात गांगुलीने दोन चौकार आणि दोन षटकार मारले. नियमानुसार त्याला निवृत्ती घ्यावी लागली. गांगुलीशिवाय अभिषेक दालमियाने १३ आणि मोहम्मद अझरुद्दीनने दोन धावा केल्या.

अशा प्रकारे गांगुलीच्या संघाला निर्धारित १५ षटकांत केवळ १२७ धावा करता आल्या आणि संघाचा सामना एका धावेने गमवावा लागला. बीसीसीआय सचिव जय शाह यांनी शानदार गोलंदाजी करताना ५८ धावांत तीन बळी घेतले.

## किशोर गट राज्य कबड्डी निवड चाचणी परभणीत

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, परभणी जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने आणि साई क्रीडा मंडळ खेडूला यांच्या विद्यमाने २० ते २२ डिसेंबर या कालावधीत किशोर गट (मुले/मुली) राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. परभणी जिल्ह्यातील पाथरी येथील कबड्डीमहर्षी स्व. शंकरराव (बुवा) साळवी क्रीडानगरी, जायकवाडी वसाहत येते चार मातीच्या क्रीडांगणावर ही स्पर्धा खेळविण्यात येईल.

या स्पर्धेतून २०-२० जणांचा मुले व मुलींचा संघ निवडण्यात येईल. यातून पुन्हा १२ जणांचा निवडण्यात आलेला संघ डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात उत्तराखंडात होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करेल.

या स्पर्धेत राज्य कबड्डी संघटनेला संलग्न असलेल्या २५ जिल्ह्यांचे किशोर आणि किशोरी गटाचे संघ सहभागी होणार आहेत. या दोन्ही गटाकरिता वयाची अट १६ वर्ष (जन्मतारीख १ जानेवारी २००६ किंवा त्यानंतर) असून वजन ५५ किलोच्या आत असावयास हवे. राज्य संघटनेची ऑनलाइन नोंदणी झालेला आणि वय व वजनाच्या अटीत बसणारा खेळाडूच या स्पर्धेत खेळू शकतो. संबंधित जिल्हा संघटनांनी आपला प्रवेश अर्ज विहित नमुन्यात भरून १० डिसेंबरपर्यंत राज्य संघटनेच्या संकेतस्थळावर पाठवावा.

## विराट बाद की नाबाद?

### पंचांच्या निर्णयावरून सोशल मीडियावर उठले वादळ

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील मालिकेतील दुसरा आणि शेवटचा कसोटी सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर खेळवला जात आहे. पावसामुळे मुंबई कसोटी उशिरा सुरू झाली. या सामन्यात कर्णधार विराट कोहलीची विकेट वादात सापडली.

भारत विरुद्ध न्यूझीलंड यांच्या मुंबई कसोटीत कर्णधार विराट कोहलीने एजाज पटेलच्या चेंडूवर पुढे जाऊन बचावात्मक फटका खेळण्याचा प्रयत्न केला. पंच अनिल चौधरी यांनी त्याला आऊट दिले. भारतीय कर्णधाराने लगेच रिव्ह्यू घेण्याचा निर्णय घेतला.




चेंडू आधी बॅटला लागला की पॅडला हे रिप्लेमध्ये स्पष्ट झाले नाही. नियमानुसार टीव्ही अंपायर वीरेंद्र शर्मा यांना फील्ड पार्टनरचा निर्णय स्वीकारावा लागला, ज्यामुळे कोहली खूप संतापलेला दिसत होता. यावर त्याने अंपायर नितीन मेनन यांच्याशीही संवाद साधला आणि त्याची निराशा स्पष्टपणे दिसून आली. टीव्ही कॅमेऱ्यात तो ड्रेसिंग रूमच्या बाल्कनीत उभा असल्याचे दिसले, ज्यामध्ये तो या निर्णयाने खूपच निराश दिसत होता.

विराट कोहलीच्या या विकेटवर समालोचकांनीही निराशा व्यक्त केली. या विकेटवर सोशल मीडियावरही जोरदार टीका झाली. चाहते अंपायरवर प्रचंड संतापले आणि सोशल मीडियावर नाराजीही व्यक्त केली. कोहली बाद झाल्यानंतर माजी इंग्लिश कर्णधार मायकेल वॉनने आपला निकाल देत कोहली नाबाद असल्याचे सांगितले. विराट कोहली आऊट झाल्याच्या व्हिडीओवर प्रतिक्रिया देताना वॉनने लिहिले, 'नॉट आऊट.'

## मुंबई, ठाण्याचे खो-खो संघ जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

५७वी पुरुष-महिला राज्य अजिंक्यपद निवड चाचणी खो-खो स्पर्धा सोलापूर येथील अर्धनारी नटेश्वर क्रीडा व वेळापूर (ता. माळशिरस) येथील शारीरिक शिक्षण मंडळाच्या क्रीडांगणावर ११ ते १३ डिसेंबर २०२१ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी मुंबई आणि ठाण्याचे संघ जाहीर करण्यात आले आहेत.

मुंबई जिल्ह्याचे पुरुष व महिला संघ १८ ते २१ नोव्हेंबर या कालावधीत झालेल्या मुंबई जिल्हा निवड चाचणी खो-खो स्पर्धेतून निवड करून जाहीर करण्यात आले आहेत, तर ठाणे जिल्ह्याचे पुरुष व महिला संघ २४ नोव्हेंबर रोजी नवी मुंबईतील कोपरखैरणे येथील रा. फ. नाईक विद्यालयाच्या प्रांगणात






निवड चाचणी झाली होती, त्यातून जाहीर करण्यात आले आहेत.

**मुंबई पुरुष संघ :** श्रेयस राऊळ, चैतन्य धुळप, प्रसाद पठाडे, करण गारोळे (सर्व सरस्वती स्पो. क्लब), आयुष गुरव, जितेश नेवाळकर, विश्वजीत कांबळे, सम्यक जाधव (सर्व विद्यार्थी क्रीडा केंद्र), प्रयाग कनगुटकर, शुभम शिगवण (सर्व ओम समर्थ), निरव पाटील (अमर हिंद), वेदांत देसाई (कर्णधार) (श्री समर्थ), प्रशिक्षक केदार सुर्वे, व्यवस्थापक सुधाकर राऊळ.

**मुंबई महिला संघ :** खुशबू सुतार, सेजल यादव, नम्रता यादव (कर्णधार), नताशा नतापे (सर्व सरस्वती कन्या संघ), शिवानी गुप्ता, ऐश्वर्या पिल्ले, मयूरी लोटनकर, प्रतीक्षा महाजन (सर्व शिवनेरी सेवा मंडळ), मधुरा पेडणेकर, रिद्धी कबीर (सर्व अमर हिंद मंडळ), रिया कदम, रश्मी दळवी (सर्व ओम साई ईश्वर सेवा मंडळ) प्रशिक्षक डलेश देसाई, व्यवस्थापिका अक्षया गावडे.

**ठाणे पुरुष संघ :** गजानन शेंगाळ (कर्णधार), लक्ष्मण गवस, आकाश कदम, जितेश म्हसकर, संकेत कदम, निखिल वाघे, आकाश तोरणे, अक्षय कळसेकर, शुभम उतेकर, सिद्धेश तांडेल, अक्षय भोईर, अमन टोळे. प्रशिक्षक विकास कोळी, व्यवस्थापक ऋषिकेश हिवरकर.

**ठाणे महिला संघ :** मृणल कांबळे (कर्णधार), रूपाली बडे, दीक्षा कदम, तेजश्री कोंढाळकर, पूजा फरगडे, गीतांजली नरसाळे, कविता घाणेकर, रेश्मा राठोड, मनोरमा शर्मा, दीक्षा सोनसुलकर, अश्विनी मोरे, कल्याणी कंक, प्रशिक्षक महेश (मयूर) पालांडे, व्यवस्थापिका पूजा सजगणे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com